## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

शुक्रवार, दि. 26.05.2017 रोजी दुपारी 03.00 वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा. सौ. शैलजा किशोर स्वामी, महापौर**

सर्वश्री श्रीमती/

| | |
|---|---|
| कुरेशी शफी अहेमद | कदम गंगाबाई नारायण |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | सातोलीकर श्रीनिवास आशन्ना |
| पवळे उमेश देवराव | कंठेवाड सविता मारोतराव |
| बियाणी प्रविण बालाप्रसाद | चव्हाण आनंद शंकरराव |
| अन्नेवार गंगासागर संदिप | कल्याणकर बालाजी देविदासराव |
| भवरे किशोर दामोधर | कदम शीला सुनिल |
| प्रमोद मुरलीधराव खेडकर | कनकदंडे मोहिनी महेशराव |
| वाजेदा तबस्सुम अथर अली खाँ | सय्यद जानी म. कासीम |
| मोकले सोनाबाई रामचंद्र | पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश |
| जाधव जयश्री आनंद | गुर्रम विनयकुमार जगदिश |
| चव्हाण श्रध्दा सुशिल | गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ |
| उमरेकर अशोक रावण | मुदिराज कमलाबाई रामस्वामी |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | देशमुख बाळासाहेब गंगाधरराव |
| सय्यद इतरत फातेमा स. मजहर हुसेन | गफार खान गुलाम महमंद खान |
| धबाळे गणपत गुणाजी | यादव तुळजाराम गणेशलाल |
| खेडकर ज्योती महेंद्र | राओत्रे संगिता पृथ्वीराज |
| गिल सरजीतसिंघ पंजाबसिंघ | अ. हबीब अ. रहीम बागवान |
| अब्दुल फसीया फिरदोस | अ. सत्तार अ.गफुर |
| आसीया बेगम अ. रहीम बागवान | स. शेर अली स. महेबुब अली |
| इशरत फातेमा अ. शमीम | कुरेशी चाँद पाशा खाजा |
| तहेसीन बेगम अ. समद | फारुख हुसेन कासीम साब |
| राखेवार सतिष शेषप्पा | चाऊस हसीना बेगम साबेर चाऊस |
| गुरुखुर्दे सुंदरलाल किशनलाल | सुदर्शना महेश (बाळु) खोमणे |
| बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला | लतीफा बेगम बु-हाण खान |
| रावत दिपकसिंह काशिनाथसिंह | ठाकुर अन्नपुर्णा जम्मुसिंह |
| किशोर किशनलाल यादव | सोडी गुरुप्रितकौर दिलीपसिंघ |
| गायकवाड वैजयंती भिमराव | मोरे संजय गंगाधरराव |
| अभिषेक रमेशराव सौदे | देशमुख मंगला गजानन |
| सौ.ललिता मुंकुंदराव बोकारे | विनय विश्वांबर पाटील |
| जमदाडे करुणा भिमराव | येवनकर विजय हिराचंद |
| कदम विश्वास बालाजी | अङ बन शाम वामनराव |
| अल केसरी हसन बिन उमेद | काबरा रामनारायण रामदेव |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सौ. शैलजा किशोर स्वामी, महापौर हे होते तसेच श्री समीर उन्हाळे आयुक्त, श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त (विकास), श्री कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, डॉ. स्मीता ठाकरे, प्र. मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री संतोष कंदेवार मुख्यलेखाधिकारी तथा उपायुक्त (महसुल), श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियता (साबांवि). श्री सुग्रीव अंधारे कार्यकारी अभियंता पापुजनि, व महानगरपालिकेतील सर्व सहायक आयुक्त, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते

सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले.

**महापौर** उपस्थित सर्व स. सदस्य, आयुक्त, अधिकारी कर्मचारी याचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामाकाजास सुरुवात करण्यात येते.

**विरोधी पक्ष नेता** मा. आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वडीलाचे निधन झाले. त्यांना श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

**सरजितसिंघ गिल** आपल्या मनपाचे माजी उप अभियंता यांचे देखील निधन झाले आहे त्यांना श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

**विनय गुरुम** आताच माझे मित्र व श्री खेडकर व श्री गिल साहेबांनी जो श्रध्दाजंली अर्पण करण्याचा जो प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे. व दोन मिनिट उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करावी अशी मी पुर्ण सभागृहास विनंती करतो.

**सभागृहनेता** सर्व सभागृहा मार्फत श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**महापौर** दोन मिनीट स्तब्ध राहुन श्रध्दाजंली अर्पण करण्यात येते.

**ठराव क्रं.03** **ठराव**

मा. आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वडीलाचे निधन झाले असुन तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे माजी उप अभियंता यांचेही देखील निधन झाले आहे या दोघांना श्रध्दांजली अर्पण करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सय्यद शेर अली** भाजपाचे गटनेते श्री अभिषेक सौदे यांचे लग्न झाल्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यात येते

**सभागृहनेता** स. शेर अली यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री अभिषेक सौदे यांचे लग्न झाल्यामुळे त्यांचा अभिनंदन करण्यात येतो.

**विश्वास कदम** सध्या शहरात कच-याचा प्रश्न निर्माण झाला यावर प्रशासनाने काय उपाय योजना केली त्याबाबत खुलासा करावा व त्यानंतरच सभेला सुरुवात करण्यात यावी.

**अशोक उमरेकर** प्रथम विरोधी पक्ष नेत्याला बोलण्याचा अधिकार आहे इतर नगरसेवकांना बोलण्याची परवानगी का देण्यात आली.

**विरोधी पक्षनेता** महात्मा बसवेश्वर पुतळयाच्या जागेवरील मनपाने अतिक्रमण काढलेले आहे. त्या लोकांच्या निवा-याची व्यवस्था मनपाने केली नसल्याने आमदार साहेबांनी मनपा आयुक्तांच्या घरी जावून आंदोलन केले आहे. मा.आयुक्त मा. महापौर यांच्याकडे या लोकांचे आंदोलन केले तरी त्यांची कुठलीही व्यवस्था केली नाही उपायुक्त कंदेवार हे 20 तारखेपर्यत त्यांच्या राहाण्याची व्यवस्थेबाबत पत्र दिले पण त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. आजही हे लोक रस्त्यावर आहेत आपले घर जर तुटले असते तर आपण काय केले असते यावर महापौरांनी खुलासा करावा.

**तुलजेस यादव** दिनांक 24.5.2017 रोजी नगरेश्वर मंदिराचा प्रस्ताव नगरसचिव विभागात सादर होवूनही तो प्रस्ताव का घेण्यात आला नाही याबाबतचा खुलासा करावा.

**सौ. सुदर्शना खोमने** दिनांक 24.5.2017 रोजी प्रशासनामार्फत नगरसचिव विभागास प्रस्ताव आला होता तो प्रस्ताव विषय पत्रीकेवर का घेण्यात आला नाही त्याचे काय कारण असु शकते याबाबतचा खुलासा करावा.

**महापौर** विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या नगरसेवकास जागेवर बसण्याबाबत सुचना करावी. सर्वानी खाली बसावे.

**तुलजेस यादव** काँग्रेस पक्षाचा या मंदीराला विरोध आहे काय याबाबत खुलासा करावा.

**सभागृह नेता** 1999 पुर्वीच्या झोपडपटया या निष्कासीत करु नये असा शासन निर्णय आहे. झोपडपटीवासी हे सरकारी जागेवर वास्तव्य करीत असतील तर त्यांची इतरत्र व्यवस्था प्रशासनाने करावी असा नियम आहे. प्रशासना मार्फत नगरसचिव विभागास आजच प्रस्ताव प्राप्त झालेला असुन त्या नागरीकांन महापालिका क्षेत्रातील बीएसयुपी योजने अंतर्गत बांधलेल्या घरकुलामध्ये स्थलांरित नियमानुसार करण्यासाठीच्या प्रस्तावास आजच्या सभेस मान्यता देवुन त्यांना स्थलांतरीत त्यांना दिलासा देण्यात यावा.

**अ. सत्तार अ.गफुर** सभागृहनेता यांनी जो म्हणटले की नगरसचिव विभागास प्राप्त झालेला प्रस्तावास आजच्या सभेत मान्यता देण्यात बाबतचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** आयुक्तांनी याबाबत खुलासा करावा.

**आयुक्त** महात्मा बसवेश्वर पुतळयाची जागा ही मनपाने हस्तांतरीत करुन घेतलेली आहे तया जागेवरा झालेले अतिक्रमण हे त्या जागेवर असलेल्या झोपड पटीधारकांच्या निवा-याची व्यवस्था इतर ठिकाणी करण्यात येईल मा. पालकमंत्री महोदय यांच्याशी देखील या विषयी चर्चा झालेली असुन त्यांच्या आदेशाप्रमाणे निर्णय घेण्यात येईल.

**दिपकसिंघ रावत** प्रशासनाने ज्या नागरीकांचे अतिक्रमण काढले त्यांना स्थलांतरीत करण्यासाठीचा जो प्रस्ताव आज नगरसचिव विभागास दिलेला आहे त्यास मान्यता देण्यात यावी अशी महापौरांना मी विनंती करतो.

**अशोक उमरेकर** पत्रकांराना गॅलरीत बसवण्याची परवानगी देण्यात यावी.

**महापौर** सभागृहाचे दार बंद करुन घेण्यात यावे.

**सभागृह नेता** पत्रकारांना मिटींगची माहिती मिळायच्या दृष्टीने सर्व व्यवस्था केलेली असून ते नारेबाजी करीत असतील तर त्यांच्या विरुध्द गुन्हे दाखल करण्यात यावेत.

**गोंधळ सुरु झाला.**

**विरोधी पक्ष नेता** याच बैठकीत प्रस्ताव ठेवून ठराव पास करुन घेण्यात यावा व त्यांना जागा देण्यात यावी या सभेत कायम करावे.

**सरजितसिंघ गील** महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळयाच्या जागी अतिक्रमण झाल्यामुळे प्रशासनाने त्या ठिकाणावरुन लोकांना काढले जेकी त्या लोकाकडे पीआर कार्ड, रजिष्ट्री, टॅक्सची पावती या बाबी असल्यामुळे प्रशासनाचा मी निषेध व्यक्त करतो. त्या लोकांचे वजिराबाद साईटवर त्यांचे पुर्नवसण करण्यात यावे. जर बीएसयुपी मध्ये एवढे विस्थापीत लोक नव्हती तर एवढी घरे का बांधण्यात आली भारत सरकारचे अरबो रुपयाचे नुकसान का

करण्यात आले यावर खुलासा करण्यात यावा. याला कोण जबाबदार आहे याची सखोल चौकशी करावी. या लोकांचे गोवर्धन घाट साईटवर पुर्नवसन करावे. याबाबतचा ठराव या सभेत ठेवून कायम करण्यात यावा. श्री बंडू खेडकर यांनी अनुमोदन दयावे.

**विरोधी पक्ष नेताः** अनुमोदन आहे.

**अशोक उमरेकर** ज्यावेळेस आपण घर नंबर देतो त्यावेळी सर्व कागदपत्रे तपासल्यावरच देतो. त्याशिवाय घर नंबरची कार्यवाही पुर्ण होत नाही म्हणून या गरीब लोकांना न्याय दयावा. पंतप्रधानाने रस्त्यावर बसलेल्या लोकांना घरे देण्याची योजना राबवली आहे हे लोक तर ऑलरेडी त्यांच्या स्वतःच्या घरात राहत आहेत तेव्हा त्यांना न्याय देण्यात यावा.

**अशोक उमरेकर/श्री सौदे/श्री बाळासाहेब देशमुख** सर्व सभागृहाचे अनुमोदन आहे.

**अभिषेक सौदे** मी सर्व सभागृहाचे आभार व्यक्त करतो. माझे लग्न झाल्याबददल त्यांनी अभिनंदन केले त्याबददल सभागृहाचा मी ऋणी आहे. मी लग्नाला बोलवू जरी शकलो नसलो तरी स्वागत समारंभाचा कार्यक्रम मला घ्यायचा होता परंतू माझे आजोबा यांचे दुःखद निधन झाले त्यामुळे हा कार्यक्रम करु शकलो नाही. मी जे अतिक्रमण काढले त्या प्रभागाचे मी प्रतिनिधीत्व करतो प्रथमतः मी प्रशासनाचा निषेध व्यक्त करतो.तेथील नागरीकाकडे सर्व कागदपत्रे होती. दसरे असे की 24.5.2017 रोजी नगरेश्वर मंदिराचा प्रस्ताव नगरसचिव विभागात सादर करुनही तो विषय पत्रीकेवर आलेला नाही. आपला नगरेश्वर मंदिराला विरोध का आपला या समाजाला विरोध आहे काय हे सांगावे.हा विषय आयत्यावेळी घेवून पास करण्यात यावा अशी मी सभागृहास विनंती करतो.तसेच महात्मा बसवेश्वराच्या पुतळयाची जागा झाली परंतू तो पुतळा कधी बसणार आहे ती पुतळा तयार आहे काय का याबाबतची माहिती दयावी.

**सौ. सुदर्शनास खोमणे** नगरेश्वर मंदिराच्या जागेवरील आरक्षण उठविण्यासाठी दि. 24.5.2017 रोजी प्रजी प्रशासनामार्फत प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा असे पत्र प्रशासनाने दिेले होते. सदर प्रस्ताव हा विषय पत्रिकेत आला नाही. हा विषय आयत्या वेळी ठेवून पास करुन देण्यात यावा.

**विरोधी पक्ष नेता** एका समाजाबददल आपला विरोध आहे काय हे तरी आम्हाला सांगावे. जर प्रशासनाकडून आलेला प्रस्ताव आपल्या फायदयाचा असेल तर विषय पत्रिकेवर घेण्यात येत नाही याबाबतचा खुलासा करावा.

**अ. सत्तार अ. गफुर** महापौरांना खुलासा देण्याची आवश्यकता नाही तो त्यांचा अधिकार आहे. श्री तुलजेस यादव : आम्हाला खुलासा दिल्याशिवाय आम्ही जाग्यावर बसणार नाही. महापौरांनी खुलासा करावा.

**विनय गुर्रम** सदरील प्रस्ताव हा भाजप सेनेचा असल्याने त्यास आपला विरोध आहे या समाजाचे आपणास कामे करावयाची नाहीत काय हे सांगा. नगरेश्वर मंदिराचा विषय हा महत्वाचा आहे. त्यामुळे या विषयाला पास करावे.

**बराच वेळ गोंधळ सुरु होता.**

**महापौर** सर्वानी आपआपल्या जागेवर जावून बसावे.

**(मा.महापौराच्या डायसवर नगरसेवक जमा झाले )**

**(मा. महापौराच्या डायसवरील माईकची तोडफोड केली.)**

**महापौर** श्री विनय गुर्रम यांना निलबिंत करण्यात येते.

**विरोधी पक्ष नेता** निलबिंत करण्याचे कारण सांगावे.

**महापौर** सभा तहकुब करण्यात येते.

(सर्व साधारण सभा वेळ 3.30 वाजता तहकुब करण्यात आली.)

**महापौर** तहकुब करण्यात आलेली सभा 4.00 वाजता सुरु करण्यात येत्या.

**सभागृह नेता** स.सदस्य श्री विनय गुर्रम यांना निलबिंत करण्यात आलेले आहे. त्यामुळे त्यांनी सभागृहात बसू देवू नये.

**महापौर** श्री विनय गुर्रम यांनी सभागृहात बसू नये, कारण त्यांना निलबिंत करण्यात आले आहे.

**विरोधी पक्षनेता** श्री गुर्रम यांना कोणत्या कारणासाठी निलबिंत केले याचा अगोदर खुलासा करावा.

**महापौर** तुमच्या पक्षाचे बोलत असताना एकएकाने बोलावे असे माझे आदेश आहेत.

**आनंद चव्हाण** यांची काय दादागीरी आहे काय ?

**सौ. ललिता बोकारे** एक महिला प्रतिनिधी, नगरसेविका, मनपाची एक संसदीय महिला म्हणुन आदरणीय महापौर मॅडम, उप महापौर आयुक्त,उप आयुक्त, साहेब आपली संसदीय सभा ज्या वेळी सुरु होते त्यावेळी विरोधी पेक्ष नेत्याला सुरुवातीस संधी देणे अशी सवय लावलेली आहे. एक महिला महापौर असतांना चार चार नगरसेवक हे डायसवर जावून बोलतात हे योग्य नाही. दुसरे म्हणजे 50 टक्के महिला नगरसेवक हे असतांना त्यांना बोलण्याची संधी दिली जात नाही हे योग्य नाही.

**गोधंळ सुरु झाला.**

**( मनपाकेचे कंत्राटी चार सुरक्षा रक्षक सभागृहात बोलावण्यात आले होते)**

| | |
|---|---|
| **अशोक उमरेकर** | या लोकांना बाहेर काढावे त्यांना कोणी परवानगी दिली. |
| **विरोधी पक्षनेता** | हे सभागृहात कसे येवू शकता हे सांगावे. |
| **अ. सत्तार अ.गफुर** | महापौरांचा अधिकार आहे. ते कोणाला सभागृहात घ्यावेत. पुर्ण विषय पत्रिका पासर करण्यात येते. |
| | **गोधंळ सुरु झाला.** |
| | सभागृहात घोषणा देण्यात येत होत्या. |
| **सभागृह नेता** | विषय पत्रिका पास करण्यात येते. |
| **संजय मोरे** | सभागृहनेता यांनी जो विषय पत्रिका मंजुर करण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात यावी तसेच मा. महापौर यांना विशेष बाब म्हणुन आयत्या वेळीचे आवश्यक असलेल्या प्रस्तावास मान्यता देण्या बाबतचे अधिकार देण्यात येते. |
| **उमेश पवळे** | सभागृहनेता यांनी जो विषय पत्रिका मंजुर करण्यास व श्री संजय मोरे यांनी मा. महापौर यांना विशेष बाब म्हणुन आयत्या वेळीचे विषय घेण्याचे अधिकारा देण्या बाबतचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. |

**विषय क्रं.01**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/1992/2017/ दिनांक 11.05.2017 अन्वये **श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 194 दिनांक 27.03.2015 मध्ये नमुद केल्यानुसार भारत देशातील स्वातंत्र सैनिक, समाज सुधारक / समाज सेवक व इतर क्षेत्रात अतुलनिय कार्य करणा-या अनेक महान व्यक्तीचे जयंती व पुण्यतिथी निमित्य नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रम व्याख्यानमाला व इतर कार्यक्रमाचे दरवर्षी आयोजन करण्यात येत असते, त्याच धर्तीवर श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांचे जयंतीचे तारखेपासुन 30 दिवसाचे आत दरवर्षी नावाशमनपाकेच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानमाला व इतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे असे सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता दिली आहे.

त्याअन्वये मा. श्री आनंद चव्हाण माजी उपमहापौर तथा स. सदस्य मनपा नांदेड यांचे निवेदन दि. 09.02.2017 अन्वये प्राप्त निवेदनानुसार उक्त ठरावानुसार श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंती निमित्त नावाशकनपाकेच्या वतीने व्याख्यानमाला, विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता व श्री संजय जाधव सहाय्यक आयुक्त यांची समन्वये अधिकारी म्हणुन कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/15911/17 दिनांक 22.02.2017 च्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्यानुसार संबंधीतांनी सदर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रुपरेषा केल्यानुसार सदर कार्यक्रमास एकूण रुपये 1,75,000/- (अक्षरी रुपये एक लाख पंच्याहत्तर हजार फक्त) एवढा खर्च अपेक्षीत असुन सदरची अग्रिम श्री संजय जाधव समन्वय अधिकारी (व्याख्यानमाला) तथा सहाय्यक आयुक्त स्वच्छता विभाग मनपा नांदेड यांचे नावे देण्यासाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात आली.

त्यान्वये संबंधीतांनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी आवश्यकती सर्व कार्यवाही विहित कालावधीत पुर्ण करावी सदर आदेशाची अमलबजावणी परिणामाने व्हावे. यावर होणारा खर्च सालसन 2017-18 च्या संबंधीत लेखा शिर्षा खालील तरतुदीतुन करण्यास मान्यता देण्यात देण्यात आली **त्याची नोंद घेणे बाबत.**

| | |
|---|---|
| **महापौर** | प्रशासनाच्या आदेशाची नोंद बहुमताने घेण्यात येते. |

**ठराव क्रं.04** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/1992/2017/ दिनांक 11.05.2017 अन्वये **श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 194 दिनांक 27.03.2015 मध्ये नमुद केल्यानुसार भारत देशातील स्वातंत्र सैनिक, समाज सुधारक / समाज सेवक व इतर क्षेत्रात अतुलनिय कार्य करणा-या अनेक महान व्यक्तीचे जयंती व पुण्यतिथी निमित्य नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रम व्याख्यानमाला व इतर कार्यक्रमाचे दरवर्षी आयोजन करण्यात येत असते, त्याच धर्तीवर श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांचे जयंतीचे तारखेपासुन 30 दिवसाचे आत दरवर्षी नावाशमनपाकेच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानमाला व इतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे असे सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता दिली आहे.

त्याअन्वये मा. श्री आनंद चव्हाण माजी उपमहापौर तथा स. सदस्य मनपा नांदेड यांचे निवेदन दि. 09.02.2017 अन्वये प्राप्त निवेदनानुसार उक्त ठरावानुसार श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंती निमित्त नावाशकनपाकेच्या वतीने व्याख्यानमाला, विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता व श्री संजय जाधव सहाय्यक आयुक्त यांची समन्वये अधिकारी म्हणुन कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/15911/17 दिनांक 22.02.2017 च्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्यानुसार संबंधीतांनी सदर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रुपरेषा केल्यानुसार सदर कार्यक्रमास एकूण रुपये 1,75,000/- (अक्षरी रुपये एक लाख पंच्याहत्तर हजार फक्त) एवढा खर्च अपेक्षीत असुन सदरची अग्रिम श्री संजय जाधव समन्वय अधिकारी (व्याख्यानमाला) तथा सहाय्यक आयुक्त स्वच्छता विभाग मनपा नांदेड यांचे नावे देण्यासाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात आली.

त्यान्वये संबंधीतांनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी आवश्यकती सर्व कार्यवाही विहित कालावधीत पुर्ण करावी सदर आदेशाची अमलबजावणी परिणामाने व्हावे. यावर होणारा खर्च सालसन 2017-18 च्या संबंधीत लेखा शिर्षा खालील तरतुदीतुन करण्यास मान्यता देण्यात देण्यात आली त्याची नोंद हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने घेते.

**विषय क्रं.02**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/१५००/१७ दि. २९ एप्रिल २०१७ अन्वये शासन निर्णय क्रं. मभवा-१११६/प्र.क्र.४४/ सेवा-९ दिनांक २१ ऐप्रील २०१७ नुसार राज्य शासकीय व इतर कर्मचारी तसेच ज्यांना महागाई भत्ता लागु आहे. अशा वेतन धारकांना दिनांक ०१ जुलै २०१६ पासुन सुधारीत वेतनसंरचनेतील मुळ वेतनावरील (वेतनबँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्याच्या दर १३२% असा करण्यात यावा असे शासन निर्णय आहे.

शासनाने शासकीय कर्मचा-यांना महागाई भत्यात वाढ केल्यानंतर शासन निर्णय नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेतील कर्मचा-यांनाही सुधारीत दराने महागाई भत्ता लागु करण्यात येवुन त्यास कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर सादर करण्यात यावा असे नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, नांदेड सर्व साधारण सभा ठराव क्रं २६ दिनांक २८.०५.२०१२ अन्वये मनपासर्वसाधारण सभेने निर्देशित केल्यानुसार महानगरपालिकेतील कार्यरत वेतनधाराकांना दिनांक ०१ जुलै २०१६ पासून मुळ वेतन व ग्रेड वेतन यावर १३२ % दराने महागाई भत्ता लागु करण्याची प्रशासकीय व आर्थीक मान्यता सदरील आदेशाव्दारे देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यतेस्तव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.

**महापौर** प्रशासनाच्या आदेशास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक बहुमताने मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.05** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/१५००/१७ दि. २९ एप्रिल २०१७ अन्वये शासन निर्णय क्रं. मभवा-१११६/प्र.क्र.४४/ सेवा-९ दिनांक २१ ऐप्रील २०१७ नुसार राज्य शासकीय व इतर कर्मचारी तसेच ज्यांना महागाई भत्ता लागु आहे. अशा वेतन धारकांना दिनांक ०१ जुलै २०१६ पासुन सुधारीत वेतनसंरचनेतील मुळ वेतनावरील (वेतनबँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्याच्या दर १३२% असा करण्यात यावा असे शासन निर्णय आहे.

शासनाने शासकीय कर्मचा-यांना महागाई भत्यात वाढ केल्यानंतर शासन निर्णय नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेतील कर्मचा-यांनाही सुधारीत दराने महागाई भत्ता लागु करण्यात येवुन त्यास कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर सादर करण्यात यावा असे नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, नांदेड सर्व साधारण सभा ठराव क्रं २६ दिनांक २८.०५.२०१२ अन्वये मनपासर्वसाधारण सभेने निर्देशित केल्यानुसार महानगरपालिकेतील कार्यरत वेतनधाराकांना दिनांक ०१ जुलै २०१६ पासून मुळ वेतन व ग्रेड वेतन यावर १३२ % दराने महागाई भत्ता लागु करण्याची प्रशासकीय व आर्थीक मान्यता सदरील आदेशाव्दारे देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने देते.

**विषय क्रं.03**

महाराष्ट्र शासन निर्णय क्रं. निमवा/२०१७/प्र.क्र.५९/सेवा-४ दिनांक २४ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयानुसार मनपा **निवृत्ती वेतन धारक यांचे निवृत्ती वेतनावर** मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. २६ दि. २८.०५.२००२ नुसार कार्योत्तर मान्यतेस अधिन राहुन दि. ०१ जुलै २०१६ पासुन अनुज्ञेय महागाई वाढीचा दर **१२५% वरुन १३२%** करण्यात येत आहे सदर माहागाई वाढीचा रक्कम रोखीने अदाई करण्याची प्रशासकिय व आर्थीक मंजुरी प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.

**महापौर** प्रशासनाच्या आदेशास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक बहुमताने मान्यता देण्यात येते

**ठराव क्रं.06** **ठराव**

महाराष्ट्र शासन निर्णय क्रं. निमवा/२०१७/प्र.क्र.५९/सेवा-४ दिनांक २४ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयानुसार मनपा **निवृत्ती वेतन धारक यांचे निवृत्ती वेतनावर** मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. २६ दि. २८.०५.२००२ नुसार कार्योत्तर मान्यतेस अधिन राहुन दि. ०१ जुलै २०१६ पासुन अनुज्ञेय महागाई वाढीचा दर **१२५% वरुन १३२%** करण्यात येत आहे सदर माहागाई वाढीचा रक्कम रोखीने अदाई करण्याची प्रशासकिय व आर्थीक मंजुरी प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने देते.

**विषय क्रं.04**

नावाशमनपा अंतर्गत गुरु-ता-गद्दी सोहळा तसेच JNNURM अंतर्गत रस्त्याचे विकास करण्यासाठी संपादीत करण्यात आलेल्या जागेचे भुसंपादन प्रस्ताव व प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी सेवानिवृत्त अधिकारी यांची तात्पुरती एकत्रीत मानधनावर नियुक्ती केली होती. सध्या भुसंपादन विभागात विशेष कार्यासन अधिकारी म्हणुन कार्यरत असलेले सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी **श्री आर. एच. डोईजड** यांच्या सेवेत का. आ. क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-१५८००/१७ दि. २०.०२.२०१७ अन्वये दि. ३१.०३.२०१७ पर्यंत मुदतवाढ देऊन शासन निर्णयानुसार त्यांची एकत्रीत मानधनावरील सदरील नियुक्ती ही दि. ३१.०३.२०१७ रोजी संपुष्टात आणली आहे.

मनपाकेच्या भुसंपादन विभागातील विशेष कार्यासन अधिकारी यांची सेवा दि. ३१ मार्च २०१७ रोजी समाप्त होणार असल्याने सदर विभागातील (१) नांदेड शहरा अंतर्गत विविध कामासाठी लागणा-या खाजगी जागेचे भुसंपादन पस्ताव सादर करणे (२) गुरु-ता-गद्दी त्रीशताब्दी सोहळा २००८ नांदेड शहर विकास योजना अंतर्गत भुसंपादन प्रकरणातील वाढीव मावेजा मागणीचे न्यायालयात सुमारे ७०० एल.ए.आर प्रकरणे सुनावणीसाठी प्रलंबीत आहेत. या प्रकरणात सुनावणी वेळोवेळी न्यायालयात उपस्थित राहुन पुरावे सादर करुन मनपाकेची बाजु मांडणे (३) गुरु-ता-गद्दी त्रीशताब्दी सोळहा २००८ अंतर्गत भुसंपादन प्रक्रिया पुर्ण करणे (४) न्यायालयाच्या निर्णयानुसार १५५ एलएआर मध्ये वाढीव मावेजा आकारणी करुन वितरणाची कार्यवाही करणे (५) JNNURM अंतर्गत रस्ता क्रं. ०९ व ३८ या रस्त्याचे भुसंपादन प्रकरणात खाजगी वाटाघाटीची प्रक्रिया करुन अंतीम करणे तसेच नांदेड शहर विकास योजना व वेगवेगळया योजना अंतर्गत

प्रस्तावित प्रकरणातील भुसंपादनाची प्रक्रिया करणे ई. कामासाठी एक अनुभवी (भुसंपादन कामाचा अनुभव) नविन विशेष कार्यासन अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिका-याची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

करिता मनपाकेच्या भुसंपादन विभागाकरिता एका नविन विशेष कार्यासन अधिकारी म्हणुन उपजिल्हाधिकारी संवर्गीय सेवेमधुन सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती करणेसाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रं. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७.१२.२०१६ च्या अधिन राहुन त्यांची मानधन तत्वावर प्रतिमहा रुपये १५,०००/- मानधनावर नियुक्ती करणे बाबतचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सभागृहनेता** — श्री आर.एच. डोईजड सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी यांची मुदत 31.03.2017 रोजी संपुष्टात आल्याचे सदरील प्रस्तावास नमुद करुन त्यांच्या जागेवर भुसंपादन विभागासाठी एका नविन विशेष कार्यासन अधिकारी म्हणुन उपजिल्हाधिकारी संवर्गीय सेवेमधुन सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती करण्या बाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मान्यतेसाठी सादर केला आहे. तथापि महापालिकेच्या भुसंपादन विभागासाठी नविन विशेष कार्यासन अधिकारी म्हणुन उपजिल्हाधिकारी संवर्गीय सेवेमधुन सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती होई पर्यंत श्री आर.एच. डोईजड यांना विशेष कार्यासन अधिकारी म्हणुन मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात यावी.

**अ. सत्तार अ. गफुर** — सभागृहनेता यांनी महापालिकेच्या भुसंपादन विभागासाठी नविन विशेष कार्यासन अधिकारी म्हणुन उपजिल्हाधिकारी संवर्गीय सेवेमधुन सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती होई पर्यंत श्री आर.एच. डोईजड यांना विशेष कार्यासन अधिकारी म्हणुन मुदतवाढ देण्या बाबतचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** — सभागृहनेता यांनी पुढील प्रमाणे दुरुस्ती प्रस्ताव मांडला श्री आर.एच. डोईजड सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी यांची मुदत 31.03.2017 रोजी संपुष्टात आल्याचे सदरील प्रस्तावास नमुद करुन त्यांच्या जागेवर भुसंपादन विभागासाठी एका नविन विशेष कार्यासन अधिकारी म्हणुन उपजिल्हाधिकारी संवर्गीय सेवेमधुन सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती करण्या बाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मान्यतेसाठी सादर केला आहे. तथापि महापालिकेच्या भुसंपादन विभागासाठी नविन विशेष कार्यासन अधिकारी म्हणुन उपजिल्हाधिकारी संवर्गीय सेवेमधुन सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती होई पर्यंत श्री आर.एच. डोईजड यांना विशेष कार्यासन अधिकारी म्हणुन मुदतवाढ देण्यास बहुमताने मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्या येतो.

**ठराव क्रं.07**

**ठराव**

नावाशमनपा अंतर्गत गुरु-ता-गद्दी सोहळा तसेच JNNURM अंतर्गत रस्त्याचे विकास करण्यासाठी संपादीत करण्यात आलेल्या जागेचे भुसंपादन प्रस्ताव व प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी सेवानिवृत्त अधिकारी यांची तात्पुरती एकत्रीत मानधनावर नियुक्ती केली होती. सध्या भुसंपादन विभागात विशेष कार्यासन अधिकारी म्हणुन कार्यरत असलेले सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी **श्री आर. एच. डोईजड** यांच्या सेवेत का. आ. क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-१५८००/१७ दि. २०.०२.२०१७ अन्वये दि. ३१.०३.२०१७ पर्यंत मुदतवाढ देऊन शासन निर्णयानुसार त्यांची एकत्रीत मानधनावरील सदरील नियुक्ती ही दि. ३१.०३.२०१७ रोजी संपुष्टात आणली आहे.

मनपाकेच्या भुसंपादन विभागातील विशेष कार्यासन अधिकारी यांची सेवा दि. ३१ मार्च २०१७ रोजी समाप्त होणार असल्याने सदर विभागातील (१) नांदेड शहरा अंतर्गत विविध कामासाठी लागणा-या खाजगी जागेचे भुसंपादन पस्ताव सादर करणे (२) गुरु-ता-गद्दी त्रीशताब्दी सोहळा २००८ नांदेड शहर विकास योजना अंतर्गत भुसंपादन प्रकरणातील वाढीव मावेजा मागणीचे न्यायालयात सुमारे ७०० एल.ए.आर प्रकरणे सुनावणीसाठी प्रलंबीत आहेत. या प्रकरणात सुनावणी वेळोवेळी न्यायालयात उपस्थित राहुन पुरावे सादर करुन मनपाकेची बाजु मांडणे (३) गुरु-ता-गद्दी त्रीशताब्दी सोळहा २००८ अंतर्गत भुसंपादन प्रक्रिया पुर्ण करणे (४) न्यायालयाच्या निर्णयानुसार १५५ एलएआर मध्ये वाढीव मावेजा आकारणी करुन वितरणाची कार्यवाही करणे (५) JNNURM अंतर्गत रस्ता क्रं. ०९ व ३८ या रस्त्याचे भुसंपादन प्रकरणात खाजगी वाटाघाटीची प्रक्रिया करुन अंतीम करणे तसेच नांदेड शहर विकास योजना व वेगवेगळया योजना अंतर्गत प्रस्तावित प्रकरणातील भुसंपादनाची प्रक्रिया करणे ई. कामासाठी एक अनुभवी (भुसंपादन कामाचा अनुभव) नविन विशेष कार्यासन अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिका-याची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

करिता मनपाकेच्या भुसंपादन विभागाकरिता एका नविन विशेष कार्यासन अधिकारी म्हणुन उपजिल्हाधिकारी संवर्गीय सेवेमधुन सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती करणेसाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रं. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७.१२.२०१६ च्या अधिन राहुन त्यांची मानधन तत्वावर प्रतिमहा रुपये १५,०००/- मानधनावर नियुक्ती करणे बाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहेत.

तथापि मनपाकेच्या भुसंपादन विभागासाठी नविन विशेष कार्यासन अधिकारी म्हणुन उपजिल्हाधिकारी संवर्गीय सेवेमधुन सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती होई पर्यंत श्री आर.एच. डोईजड सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी यांची मुदत 31.03.2017 रोजी संपुष्टात आली असुन संबंधीतास 01.04.2017 चा तांत्रीक खंड देवुन भुसंपादन विभागासाठी विशेष कार्यासन अधिकारी म्हणुन मुदतवाढ देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.05**

नावाशमनपा हद्दीत **गोवर्धन घाट भागात नांदेड शहरातील मुख्य स्मशानभुमी असल्याकारणाने सदरील स्मशानभुमिची दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे** सदर ठिकाणी नागरीक मुंडन करण्यासाठी नदीघाटावर येतात व घाटावरच मुडन करतात त्यामुळे गोवर्धन घाट

स्मशानभुमिच्या बेसमेंटच्या खालच्या बाजुला असलेल्या जागेची दुरुस्ती केल्यास नागरीक घाटावर नागरीक मुंडन न करता बेसमेंटच्या जागेवर मुंडन करतील व घाटाचा परिसन घान होणारनाही. सदरील स्मशानभुमि कडील धाटाकडे जाणारा रस्ता नादुरुस्त असून सदर रस्ता सुध्दा दुरुस्त करणे आवश्यक आहे सदरील ठिकाणी शव ठेवण्यासाठी ओटे अपुरे असल्यामुळे नव्याने ओटे बनविणे आवश्यक आहे. तसेच नागरीकांना बसण्यासाठी अस्थित्वातील पाय-या दुरुस्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी रुपये १३,५४,३४२/- खर्च अपेक्षीत आहे.

सदर काम जिल्हास्तरीय नगरोत्थानयोजने मधुन प्रस्तावित करण्यातयेत असुन ५०% मनपा हिस्सा भरणे आवश्यक आहे.

करिता नावाशमनपा हद्यीत गोवर्धन घाट स्मशानभुमिची दुरुस्ती करणेकरिता मनपा हिस्सा ५०% रु. ६,७७,१७१/- भरण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**महापौर** प्रशासनाचा प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.08** **ठराव**

नावाशमनपा हद्यीत **गोवर्धन घाट भागात नांदेड शहरातील मुख्य स्मशानभुमी असल्याकारणाने सदरील स्मशानभुमिची दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे** सदर ठिकाणी नागरीक मुंडन करण्यासाठी नदीघाटावर येतात व घाटावरच मुडन करतात त्यामुळे गोवर्धन घाट स्मशानभुमिच्या बेसमेंटच्या खालच्या बाजुला असलेल्या जागेची दुरुस्ती केल्यास नागरीक घाटावर नागरीक मुंडन न करता बेसमेंटच्या जागेवर मुंडन करतील व घाटाचा परिसन घान होणारनाही. सदरील स्मशानभुमि कडील धाटाकडे जाणारा रस्ता नादुरुस्त असून सदर रस्ता सुध्दा दुरुस्त करणे आवश्यक आहे सदरील ठिकाणी शव ठेवण्यासाठी ओटे अपुरे असल्यामुळे नव्याने ओटे बनविणे आवश्यक आहे. तसेच नागरीकांना बसण्यासाठी अस्थित्वातील पाय-या दुरुस्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी रुपये १३,५४,३४२/- खर्च अपेक्षीत आहे.

सदर काम जिल्हास्तरीय नगरोत्थानयोजने मधुन प्रस्तावित करण्यातयेत असुन ५०% मनपा हिस्सा भरणे आवश्यक आहे.

करिता नावाशमनपा हद्यीत गोवर्धन घाट स्मशानभुमिची दुरुस्ती करणेकरिता मनपा हिस्सा ५०% रु. ६,७७,१७१/- भरण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.06**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. विघयो 2013/प्र.क्र.182/नवि-4/दिनांक 01.09.2016 अन्वये सध्याच्या नागरी दलीत वस्ती सुधारणा योजनेचे नांव बदलुन ते **लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना** असे करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. बीयुडी-1416/प्र.क्र.201/नवि-4 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 29 मार्च 2017 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस **लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना** अंतर्गत सालसन 2016-17 साठी लेखाशिर्ष (2217 1141) खाली रक्कम रुपये 6,46,70,000/- (अक्षरी रुपये सहा कोटी शेचाळीस लक्ष सत्तर हजार मात्र) इतका निधी वितरीत करण्यास निर्णयातील 2 ते 14 अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुरी देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. विघयो 102000/1592/प्र.क्र.189/नवि-4 मुंबई-32 दिनांक 05 मार्च 2002 अन्वये मार्गदर्शक तत्वे विहित केले आहेत.

त्यानुसार शासनाने मंजुर केलेला निधी प्राप्त झाल्यानंतर व जिल्हयातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधीचे वितरण निश्चीत करण्यासाठी दिनांक 05 मार्च 2002 च्या शासन निर्णयान्वये पुढील प्रमाणे जिल्हास्तरी समिती जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात येत आहे असे नमुद केले आहे समिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2) | महानगरपालिकेतील नगररचना शाखाधिकारी | सदस्य |
| 3) | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सदस्य |
| 4) | महानगरपालिकेचे आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी | विशेष निमंत्रीत |
| 5) | जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासनाचे अधिकारी | सदस्य सचिव |

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रं डिव्हीवाय 2615/प्र.क्र.162/नवि-4 मुंबई 32 दिनांक 12.08.2015 अन्वये नागरी दलीत वस्ती सुधारणा योजना मार्गदर्शक तत्वाच्या दि. 05 मार्च 2002 च्या शासन निर्णयात सुधारणा करुन जिल्हयातील नागरी स्थानिक स्वश्राज्य संस्थांना वितरण निश्चीत करण्यासाठी खालील प्रमाणे सुधारणा केली आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | संबंधीत जिल्हयाचे पालकमंत्री | अध्यक्ष |
| 2) | संबंधीत जिल्हयाचे जिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3) | समाज कल्याण अधिकारी | सदस्य |
| 4) | महानगरपालिका आयुक्त | सदस्य |

या योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेली कामे दिनांक 05 मार्च 2002 च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रं. 06 मध्ये नमुद करण्यात आली आहेत. त्यामध्ये शौचालय बांधणे या घटकांसाठी देखील निधीचा वापर अनुज्ञेय आहे.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. विघयो-2617/प्र.क्र.09/नवि04 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 02 मार्च 2017 च्या निर्णयानुसार (1) **लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत** मंजुर करण्यात येणा-या अनुदानामधुन स्वच्छ भारत अभियान अंतर्गत वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम करण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे प्रति लाभार्थी अधिकतम रु. 5,000/- च्या मर्यादेत अतिरिक्त अनुदान जिल्हा स्तरीय समितीस मंजुर करता येईल (2) सदरचे अनुदान हे स्व्च्छ महाराष्ट्र अभियानाअंतर्गत वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम करण्यासाठी केंद्र व राज्यशासनाकडून प्रतिलाभार्थी रुपये 12,000/- प्रमाणे देण्यात येणा-या अनुदानाव्यतिरिक्त तसेच 14व्या वित्त आयोगाचया निधीमधुन देण्यात येणा-या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्याव्यतिरिक्त असेल.

शासन निर्णय दि. 05 मार्च 2002 अन्वये मार्गदर्शक तत्वानुसार सर्वसाधारण सभेने कामाची निवड व निश्चीती करुन ठराव पारीत केल्यानुसार प्रस्ताव मान्यतेस्तव मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडे सादर करण्यात येतात.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. बीयुडी-14166/प्र.क्र.201/नवि-04 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 29 मार्च 2017 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस **लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना** अंतर्गत सालसन 2016-17 साठी मंजुरी निधी रुपये 6,46,70,000/- च्या कामांची निवड व निश्चती करुन ठराव करुन उपलब्ध करुन देणेस्तव सदरचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.

**मोरे संजय** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक 10.08.2016 ठराव क्रं. 73, व दि. 27.02.2017 रोजी पारीत केलेल्या ठराव क्रं. 158, व 159 च्या अनुषंगाने शहरातील विविध भागात दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गतची कामे मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे शिफारस करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आली होती. तसेच प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्ताव क्रं. साबांवि/2266/17 दिनांक 18.05.2017 अन्वये दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत/लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधार योजनेखालील शहरातील उर्वरीत कामे जसे (1) मनपा सर्वसाधारण सभा दि. 10.08.16 ठराव क्रं. 73 मधील अ.क्रं. 46 वरील काम भाग-01 व मनपा सर्वसाधारण सभा दि. 27.02.17 ठराव क्रं. 159 मधील अ.क्रं. 20 वर नमुद असलेले काम भाग-02 असे दोन्ही कामे करण्यात यावी.

(2) प्रभाग क्रं. 17 रमामाता हाऊसिंग सोसायटी मध्ये सि.सि. रस्ता व नाली करणे. तसेच समतानगर भागात सि.सि. रस्ता करणे व प्रभाग क्रं. 17 मध्ये हायमस्ट लाईट बसविणे रु. 25.00 लक्ष

(3) प्रभाग क्रं. 18 मध्ये सावित्रीबाई फुलेनगर भागात रामजी आंबेडकर चौक ते श्री सोनकांबळे यांच्या घरा पर्यंत सि.सि. रस्ता करणे रु. 25.00 लक्ष

(4) मनपा हद्यीतील नविन कौठा येथील स्मशानभुमि शेजारी गोदावरी नदी घाटीवर घाटाचे बांधकाम करणे रु. 45.00 लक्ष

(5) मनपा हद्यीतील खडकपुरा भागातील मार्कण्डेय मंदिर शेजारी नल्लागुट्टाचाळ येथील सभागृहाचे बांधकाम करणे रु. 10.00 लक्षाचे कामे करण्यासाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता

**उमेश पवळे** श्री संजय मोरे यांनी सुचविलेले कामे करण्यात यावी तसेच (1) मनपा हद्यीतील भिमघाट येथे अभ्यासिकेचे बांधकाम करणे रु. 45.00 लक्ष

(2) प्रभाग क्रं. 7-अ तरोडा मध्ये सिध्दांतनगर येथे रस्ता व नालीचे बांधकाम करणे रु. 10.00 लक्ष.

(3) प्रभाग क्रं. 40 मध्ये शाहुनगर वाघाळा मध्ये सि.सि. रस्ता करणे रु. 12.50 लक्ष.

(4) प्रभाग क्रं. 37 जुना कौठा भागात अंतर्गत सि.सि. रस्त्यांचे काम करणे रु. 10.00 लक्ष

(5) मनपा हद्यीत बालाजीनगर मध्ये मल्लेशाह भोईनोल ते बुध्दविहार पर्यंत सिमेंट रस्त्याचे काम करणे रु. 12.50 लक्ष.

(6) प्रभाग क्रं. 34 धोबी घाट येथे सिमेंट रस्ता, नालीचे बांधकाम व इतर विकासाचे कामे करणे रु. 25.00 लक्ष

(7) प्रभाग क्रं.20 मध्ये मिल क्लब चौरस्ता ते पोलिस हेड क्वॉर्टरची कंपाऊंड भिंत (भिमघाट)रोड येथे सिसि रोड करणे रु.25.00 लक्षाचे कामे करण्यास मान्यता देण्यात यावी

**सतीश राखेवार** श्री संजय मोरे व श्री उमेश पवळे यांनी मांडलेल्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री संजय मोरे व श्री उमेश पवळे यांनी मांडलेल्या प्रस्तावासहीत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक 10.08.2016 ठराव क्रं. 73, व दि. 27.02.2017 रोजी पारीत केलेल्या ठराव क्रं. 158, व 159 च्या अनुषंगाने शहरातील विविध भागात दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गतची कामे मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे शिफारस करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आली होती. तसेच प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्ताव क्रं. साबांवि/2266/17 दिनांक 18.05.2017 अन्वये दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत/लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधार योजनेखालील शहरातील उर्वरीत कामे करण्यासाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

1)मनपा सर्वसाधारण सभा दि. 10.08.16 ठराव क्रं. 73 मधील अ.क्रं. 46 वरील काम भाग-01 व मनपा सर्वसाधारण सभा दि. 27.02.17 ठराव क्रं. 159 मधील अ.क्रं. 20 वर नमुद असलेले काम भाग-02 असे दोन्ही कामे करण्यात यावी.

2)प्रभाग क्रं. 17 रमामाता हाऊसिंग सोसायटी मध्ये सि.सि. रस्ता व नाली करणे. तसेच समतानगर भागात सि.सि. रस्ता करणे व प्रभाग क्रं. 17 मध्ये हायमस्ट लाईट बसविणे रु. 25.00 लक्ष

3)प्रभाग क्रं. 18 मध्ये सावित्रीबाई फुलेनगर भागात रामजी आंबेडकर चौक ते श्री सोनकांबळे यांच्या घरा पर्यंत सि.सि. रस्ता करणे रु. 25.00 लक्ष

4)मनपा हद्दीतील नविन कौठा येथील स्मशानभुमि शेजारी गोदावरी नदी घाटीवर घाटाचे बांधकाम करणे रु. 45.00 लक्ष

5)मनपा हद्दीतील खडकपुरा भागातील मार्कण्डेय मंदिर शेजारी नल्लागुट्टाचाळ येथील सभागृहाचे बांधकाम करणे रु. 10.00 लक्ष

6)मनपा हद्दीतील भिमघाट येथे अभ्यासिकेचे बांधकाम करणे रु. 45.00 लक्ष

7)प्रभाग क्रं. 7-अ तरोडा मध्ये सिध्दांतनगर येथे रस्ता व नालीचे बांधकाम करणे रु. 10.00 लक्ष.

8)प्रभाग क्रं. 40 मध्ये शाहुनगर वाघाळा मध्ये सि.सि. रस्ता करणे रु. 12.50 लक्ष.

9)प्रभाग क्रं. 37 जुना कौठा भागात अंतर्गत सि.सि. रस्त्यांचे काम करणे रु. 10.00 लक्ष

10)मनपा हद्दीत बालाजीनगर मध्ये मल्लेशाह भोईनोल ते बुध्दविहार पर्यंत सिमेंट रस्त्याचे काम करणे रु. 12.50 लक्ष.

11)प्रभाग क्रं. 34 धोबी घाट येथे सिमेंट रस्ता, नालीचे बांधकाम व इतर विकासाचे कामे करणे रु. 25.00 लक्ष

12)प्रभाग क्रं.20 मध्ये मिल क्लब चौरस्ता ते पोलिस हेड क्वॉर्टरची कंपाऊंड भिंत (भिमघाट)रोड येथे सिसि रोड करणे रु.25.00 लक्षाचे कामे करण्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.09** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक 10.08.2016 ठराव क्रं. 73, व दि. 27.02.2017 रोजी पारीत केलेल्या ठराव क्रं. 158, व 159 च्या अनुषंगाने शहरातील विविध भागात दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गतची कामे मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे शिफारस करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आली होती. तसेच प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्ताव क्रं. साबांवि/2266/17 दिनांक 18.05.2017 अन्वये दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत/लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधार योजनेखालील शहरातील उर्वरीत कामे करण्यासाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

1) मनपा सर्वसाधारण सभा दि. 10.08.16 ठराव क्रं. 73 मधील अ.क्रं. 46 वरील काम भाग-01 व मनपा सर्वसाधारण सभा दि. 27.02.17 ठराव क्रं. 159 मधील अ.क्रं. 20 वर नमुद असलेले काम भाग-02 असे दोन्ही कामे करण्यात यावी.
2) प्रभाग क्रं. 17 रमामाता हाऊसिंग सोसायटी मध्ये सि.सि. रस्ता व नाली करणे. तसेच समतानगर भागात सि.सि. रस्ता करणे व प्रभाग क्रं. 17 मध्ये हायमस्ट लाईट बसविणे रु. 25.00 लक्ष
3) प्रभाग क्रं. 18 मध्ये सावित्रीबाई फुलेनगर भागात रामजी आंबेडकर चौक ते श्री सोनकांबळे यांच्या घरा पर्यंत सि.सि. रस्ता करणे रु. 25.00 लक्ष
4) मनपा हद्दीतील नविन कौठा येथील स्मशानभुमि शेजारी गोदावरी नदी घाटीवर घाटाचे बांधकाम करणे रु. 45.00 लक्ष
5) मनपा हद्दीतील खडकपुरा भागातील मार्कण्डेय मंदिर शेजारी नल्लागुट्टाचाळ येथील सभागृहाचे बांधकाम करणे रु. 10.00 लक्ष
6) मनपा हद्दीतील भिमघाट येथे अभ्यासिकेचे बांधकाम करणे रु. 45.00 लक्ष
7) प्रभाग क्रं. 7-अ तरोडा मध्ये सिध्दांतनगर येथे रस्ता व नालीचे बांधकाम करणे रु. 10.00 लक्ष.
8) प्रभाग क्रं. 40 मध्ये शाहुनगर वाघाळा मध्ये सि.सि. रस्ता करणे रु. 12.50 लक्ष.
9) प्रभाग क्रं. 37 जुना कौठा भागात अंतर्गत सि.सि. रस्त्यांचे काम करणे रु. 10.00 लक्ष
10) मनपा हद्दीत बालाजीनगर मध्ये मल्लेशाह भोईनोल ते बुध्दविहार पर्यंत सिमेंट रस्त्याचे काम करणे रु. 12.50 लक्ष.
11) प्रभाग क्रं. 34 धोबी घाट येथे सिमेंट रस्ता, नालीचे बांधकाम व इतर विकासाचे कामे करणे रु. 25.00 लक्ष
12) प्रभाग क्रं.20 मध्ये मिल क्लब चौरस्ता ते पोलिस हेड क्वॉर्टरची कंपाऊंड भिंत (भिमघाट)रोड येथे सिसि रोड करणे रु.25.00 लक्ष

## पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्रं.01**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान विभागा मार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 01 | नांदेड शहरात एकूण कुटूंबांची संख्या | 102997 |
| 02 | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत 2016 मधील सर्वेक्षणानुसार वैयक्तिक शोचालय नसलेले कुटूंबाची संख्या | 4034 |
| 03 | आजमितीस स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) वैयक्तिक शौचालयासाठी कुटूंबाकडून कर्ज प्राप्त | 1.418 (SBM पोर्टलनुसार) |
| 04 | VERIFIED करण्यात आलेली अर्ज संख्या | 4483 (SBM पोर्टलनुसार) |
| 05 | APPROVED करण्यात आलेली अर्ज संख्या | 4279 (SBM पोर्टलनुसार) |
| 06 | REJECTED करण्यात आलेली अर्ज संख्या | 2928 (SBM पोर्टलनुसार) |
| 07 | CONSTRUCTED शौचालय संख्या | 3300 (SBM पोर्टलनुसार) |

| | | |
|---|---|---|
| 08 | CONSTRUCTED PHOTO UPLOADED | 3300 (SBM पोर्टलनुसार) |
| 09 | पात्र लाभार्थी अनुदान वाटप | 4261 लाभार्थी |
| 10 | वैयक्तिक शौचालयासाठी शासना कडून प्राप्त अनुदान | रु. 2.63 कोटी |
| 11 | वैयक्तिक शौचालयासाठी खर्च झालेला निधी | रु. 5.45 कोटी |
| 12 | वैयक्तिक शौचालयासाठी शासनाकडे मागणी केलेला निधी झालेल्या खर्चासाठी रु. 2.00 कोटी व नविन लाभार्थ्यासाठी रु. 2.00 कोटी | एकूण रु. 4.00 कोटी |
| 13 | आवश्यकत्या ठिकाणी भुमिगत ड्रेनेज लाईन टाकण्यास शासनाकडे मारणी केलला निधी | रु. 4.00 कोटी |
| 14 | प्रगतीपथावरील कामाची संख्या | 700 |
| 15 | कामाची सुरुवात न झालेली कामे | 261 |
| 16 | सामुदायिक शौचालय संख्या (6 Completed, 1 at a final stage & 6 in progress, 4 Proposed & complited at OD spots, 4 Mobile Toilets at OD spots | 13+4=17(95 सीटस) |

**महापौर** प्रशासनाने सादर केलेल्या अहवालाची नोंद बहुमताने घेण्यात येते.

**ठराव क्रं.10** **ठराव**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान विभागा मार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालील प्रमाणे असुन त्याची नोंद बहुमताने घेण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| 01 | नांदेड शहरात एकूण कुटूंबांची संख्या | 102997 |
| 02 | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत 2016 मधील सर्वेक्षणानुसार वैयक्तिक शोचालय नसलेले कुटूंबाची संख्या | 4034 |
| 03 | आजमितीस स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) वैयक्तिक शौचालयासाठी कुटूंबाकडून कर्ज प्राप्त | 1.418 (SBM पोर्टलनुसार) |
| 04 | VERIFIED करण्यात आलेली अर्ज संख्या | 4483 (SBM पोर्टलनुसार) |
| 05 | APPROVED करण्यात आलेली अर्ज संख्या | 4279 (SBM पोर्टलनुसार) |
| 06 | REJECTED करण्यात आलेली अर्ज संख्या | 2928 (SBM पोर्टलनुसार) |
| 07 | CONSTRUCTED शौचालय संख्या | 3300 (SBM पोर्टलनुसार) |
| 08 | CONSTRUCTED PHOTO UPLOADED | 3300 (SBM पोर्टलनुसार) |
| 09 | पात्र लाभार्थी अनुदान वाटप | 4261 लाभार्थी |
| 10 | वैयक्तिक शौचालयासाठी शासना कडून प्राप्त अनुदान | रु. 2.63 कोटी |
| 11 | वैयक्तिक शौचालयासाठी खर्च झालेला निधी | रु. 5.45 कोटी |
| 12 | वैयक्तिक शौचालयासाठी शासनाकडे मागणी केलेला निधी झालेल्या खर्चासाठी रु. 2.00 कोटी व नविन लाभार्थ्यासाठी रु. 2.00 कोटी | एकूण रु. 4.00 कोटी |
| 13 | आवश्यकत्या ठिकाणी भुमिगत ड्रेनेज लाईन टाकण्यास शासनाकडे मारणी केलला निधी | रु. 4.00 कोटी |
| 14 | प्रगतीपथावरील कामाची संख्या | 700 |
| 15 | कामाची सुरुवात न झालेली कामे | 261 |
| 16 | सामुदायिक शौचालय संख्या (6 Completed, 1 at a final stage & 6 in progress, 4 Proposed & complited at OD spots, 4 Mobile Toilets at OD spots | 13+4=17(95 सीटस) |

**विषय क्रं.02**

**प्रधानमंत्री आवास योजना नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये राबविण्यात येत आहे. सदर योजनेच्या निकषानुसार शहरामध्ये ऑनलाईन डिमांड सर्व्हेक्षण करण्यात आले त्यानुसार एकूण ५१०७६ अर्जदारांनी घरकुल मागणी नोंदविली आहे.** त्यामध्ये कर्ज संलग्न व्याज अनुदान योजना घटक क्रं. २ अंतर्गत ७०६६ अर्ज, खाजगी भागीदारीने परवडणा-या घरांची निर्मिती करणे घटक क्रं. ३ अंतर्गत २०२७९ अर्ज व वैयक्तीक बांधकाम करणे घटक क्रं. ४ अंतर्गत २३७२७ अर्ज प्राप्त आहेत. तसेच केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर अर्ज भरण्याची प्रक्रिया अजुनही चालु असून आजपर्यंत या संकेतसथळावर १०८८ अर्जदाराने अर्ज भरणा केले आहे.

सदर ऑनलाईन प्राप्त अर्जांची छाननी करण्यासाठी व पात्र / अपात्र बाबत तपासणी करण्यासाठी एकूण २७ मनपाचे उपअभियंते / कनिष्ठ अभियंता यांचे पथके नेमुन तपासणी प्रगतीपथावर आहे. आजपर्यंत एकूण ७०% अर्ज तपासणीचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे. मनपाच्या संकेतस्थळावर सादर केलेल्या अर्जदारांची माहिती केंद्र शासनाच्या www.pmaymis.gov.in या संकेतस्थळावरा स्थलांतर करण्याचे काम चालू आहे. मा. राज्य अभियान संचालक, प्रधानमंत्री आवास योजना यांचे पत्र क्रं. ४ दि. १८.०३.१७ व मा. संजय कुमार, अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे पत्र दि. ०५.०१.२०१७ वरे शासनाने तात्काळ कमीत कमी ०२ डीपीआर करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार प्राथमिक स्तरावर सर्व १-४० वार्डामधील वैयक्तीक बांधकाम करणे घटक क्रं. ४ मधील पात्र ५९६५ लाभार्थ्यांचे ४ डीपीआर दि. २७.०३.२०१७ रोजी म्हाडा, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आले आहेत व उर्वरीत लाभार्थ्यांचे सर्व्हेक्षण पुर्ण होताच शासनास प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. सदर प्रस्तावामध्ये वैयक्तीक बांधकाम करणो वार्डनिहाय लाभार्थी संख्या खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वार्ड क्रं. | डीपआर मध्ये अंतर्भुत एकूण लाभार्थी |
|---|---|---|
| १ | ०१ | ३४१ |
| २ | ०२ | १२२ |
| ३ | ०३ | ६७६ |
| ४ | ०४ | ७३ |
| ५ | ०५ | २९ |
| ६ | ०६ | ४२ |
| ७ | ०७ | २३३ |
| | **डीपीआर क्रं. ०१** | **१५१६ घरकुल** |
| ८ | ०८ | ३२ |
| ९ | ०९ | ०६ |
| १० | १० | १६ |
| ११ | ११ | ४० |
| १२ | १२ | ७९ |
| १३ | १३ | ४०१ |
| १४ | १४ | ४१ |
| १५ | १५ | ४३ |
| १६ | १६ | २१ |
| १७ | १७ | ३९ |
| १८ | १८ | १४९ |
| १९ | १९ | ४०८ |
| २० | २० | १० |
| | **डीपीआर क्रं. ०२** | **१२८५ घरकुल** |
| २१ | २१ | १३३ |
| २२ | २२ | १६ |
| २३ | २३ | ७८ |
| २४ | २४ | ११८९ |
| २५ | २५ | ४०४ |
| २६ | २६ | १९३ |
| २७ | २७ | ७७ |
| | **डीपीआर क्रं. ०३** | **२०९० घरकुल** |
| २८ | २८ | १४८ |
| २९ | २९ | ८५ |
| ३० | ३० | १६७ |
| ३१ | ३१ | ७७ |
| ३२ | ३२ | ३१ |
| ३३ | ३३ | ०० |
| ३४ | ३४ | १०५ |
| ३५ | ३५ | ५१ |
| ३६ | ३६ | ५८ |
| ३७ | ३७ | ८४ |
| ३८ | ३८ | १०० |
| ३९ | ३९ | ७८ |
| ४० | ४० | ९० |
| | **डीपीआर क्रं. ०४** | **१०७४ घरकुल** |

तसेच एकूण ०४ डीपीआर चा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नांव | लाभार्थी संख्या | प्रकल्पाची किमंत (लक्षा मध्ये) | प्रशासकिय व इतर खर्च (०५%) (लक्षा मध्ये) | एकूण प्रकल्प किमंत (लक्षा मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | DPR-I (BLC) | 1516 | 6731.04 | 336.55 | 7067.59 |
| 02 | DPR-II (BLC) | 1284 | 5705.4 | 285.27 | 5990.67 |
| 03 | DPR-III (BLC) | 2090 | 9279.6 | 463.98 | 9743.58 |
| 04 | DPR-IV (BLC) | 1074 | 4768.56 | 238.43 | 5006.99 |
| **एकूण** | | **5965** | **26494.6** | **1324.23** | **27808.83** |

करिता सदर प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभे समोर मंजुरीस्तव सादर.

**महापौर** प्रशासनाच्या प्रस्तावास बहुमताने मंजुर करण्यात येते.

**ठराव क्रं.11** **ठराव**

**प्रधानमंत्री आवास योजना नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्यीमध्ये राबविण्यात येत आहे. सदर योजनेच्या निकषानुसार शहरामध्ये ऑनलाईन डिमांड सर्व्हेक्षण करण्यात आले त्यानुसार एकूण ५१०७६ अर्जदारांनी घरकुल मागणी नोंदविली आहे.** त्यामध्ये कर्ज संलग्न व्याज अनुदान योजना घटक क्रं. २ अंतर्गत ७०६६ अर्ज, खाजगी भागीदारीने परवडणा-या घरांची निर्मिती करणे घटक क्रं. ३ अंतर्गत २०२७९ अर्ज व वैयक्तीक बांधकाम करणे घटक क्रं. ४ अंतर्गत २३७२७ अर्ज प्राप्त आहेत. तसेच केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर अर्ज भरण्याची प्रक्रिया अजुनही चालु असून आजपर्यंत या संकेतसथळावर १०८८ अर्जदाराने अर्ज भरणा केले आहे.

सदर ऑनलाईन प्राप्त अर्जांची छाननी करण्यासाठी व पात्र / अपात्र बाबत तपासणी करण्यासाठी एकूण २७ मनपाचे उपअभियंते / कनिष्ठ अभियंता यांचे पथके नेमुन तपासणी प्रगतीपथावर आहे. आजपर्यंत एकूण ७०% अर्ज तपासणीचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे. मनपाच्या संकेतस्थळावर सादर केलेल्या अर्जदारांची माहिती केंद्र शासनाच्या www.pmaymis.gov.in या संकेतस्थळावरा स्थलांतर करण्याचे काम चालू आहे. मा. राज्य अभियान संचालक, प्रधानमंत्री आवास योजना यांचे पत्र क्रं. ४ दि. १८.०३.१७ व मा. संजय कुमार, अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे पत्र दि. ०५.०१.२०१७ वरे शासनाने तात्काळ कमीत कमी ०२ डीपीआर करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार प्राथमिक स्तरावर सर्व १-४० वार्डामधील वैयक्तीक बांधकाम करणे घटक क्रं. ४ मधील पात्र ५९६५ लाभार्थ्यांचे ४ डीपीआर दि. २७.०३.२०१७ रोजी म्हाडा, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आले आहेत व उर्वरीत लाभार्थ्यांचे सर्व्हेक्षण पुर्ण होताच शासनास प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. सदर प्रस्तावामध्ये वैयक्तीक बांधकाम करणो वार्डनिहाय लाभार्थी संख्या खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वार्ड क्रं. | डीपआर मध्ये अंतर्भुत एकूण लाभार्थी |
|---|---|---|
| १ | ०१ | ३४१ |
| २ | ०२ | १२२ |
| ३ | ०३ | ६७६ |
| ४ | ०४ | ७३ |
| ५ | ०५ | २९ |
| ६ | ०६ | ४२ |
| ७ | ०७ | २३३ |
| | **डीपीआर क्रं. ०१** | **१५१६ घरकुल** |
| ८ | ०८ | ३२ |
| ९ | ०९ | ०६ |
| १० | १० | १६ |
| ११ | ११ | ४० |
| १२ | १२ | ७९ |
| १३ | १३ | ४०१ |
| १४ | १४ | ४१ |
| १५ | १५ | ४३ |
| १६ | १६ | २१ |
| १७ | १७ | ३९ |
| १८ | १८ | १४९ |
| १९ | १९ | ४०८ |
| २० | २० | १० |

| | | |
|---|---|---|
| | डीपीआर क्रं. ०२ | १२८५ घरकुल |
| २१ | २१ | १३३ |
| २२ | २२ | १६ |
| २३ | २३ | ७८ |
| २४ | २४ | ११८९ |
| २५ | २५ | ४०४ |
| २६ | २६ | १९३ |
| २७ | २७ | ७७ |
| | डीपीआर क्रं. ०३ | २०९० घरकुल |
| २८ | २८ | १४८ |
| २९ | २९ | ८५ |
| ३० | ३० | १६७ |
| ३१ | ३१ | ७७ |
| ३२ | ३२ | ३१ |
| ३३ | ३३ | ०० |
| ३४ | ३४ | १०५ |
| ३५ | ३५ | ५१ |
| ३६ | ३६ | ५८ |
| ३७ | ३७ | ८४ |
| ३८ | ३८ | १०० |
| ३९ | ३९ | ७८ |
| ४० | ४० | ९० |
| | डीपीआर क्रं. ०४ | १०७४ घरकुल |

तसेच एकूण ०४ डीपीआर चा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नांव | लाभार्थी संख्या | प्रकल्पाची किमंत (लक्षा मध्ये) | प्रशासकिय व इतर खर्च (०५%) (लक्षा मध्ये) | एकूण प्रकल्प किमंत (लक्षा मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | DPR-I (BLC) | 1516 | 6731.04 | 336.55 | 7067.59 |
| 02 | DPR-II (BLC) | 1284 | 5705.4 | 285.27 | 5990.67 |
| 03 | DPR-III (BLC) | 2090 | 9279.6 | 463.98 | 9743.58 |
| 04 | DPR-IV (BLC) | 1074 | 4768.56 | 238.43 | 5006.99 |
| **एकूण** | | **5965** | **26494.6** | **1324.23** | **27808.83** |

हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मंजुर करते.

**विषय क्रं.03**

नावाशमनपाकेच्या प्रशासनात गतिमानता, पारदर्शकता व लोकभिमुख सेवा मध्ये लक्षणिय सुधारण घडवुन आणण्यासाठी मनपाकेच्या विविध संवर्गातील पदनिर्मिती बाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. एनव्हीसी-320202/1350/ प्र.क्र.157/03 नवि-22 दिनांक 17.08.2004 अन्वये दिलेल्या पदनिर्मितीच्या आदेशात महापालिकेकडुन या पुढे हाती घेण्यात येणारी बहुताश कामे कायम/तात्पुरते कर्मचारी नियुक्ती न करता कंत्राटी तत्वावर घेण्यात यावे व काम संपल्यानंतर कंत्राटी सेवा संपुष्टात आणण्यात याव्यात असे नमुद आहे. ही बाब विचारात घेऊन जेएनएनयुआरएम चे कार्यक्रम संपे पर्यंत किंवा पुढील दोन वर्ष या पैकी जो कमी असेल त्या कालावधी **करिता डाटा एंट्री ऑपरेटर या पदाची आवश्यकता विचारात घेवुन प्रती महा एकत्रीत वेतन रु. 6000/- वर विहित पध्दतीचा अवलंब करुन 25 डाटा एंट्री ऑपरेटरची पदे भरण्यासाठी नावाशमनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं 137 दि. 30.10.2010 अन्वये 02 वर्षासाठी मान्यता प्रदान करण्यात आली होती.**

त्यानुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन 25 डाटा एंट्री ऑपरेटरची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर प्रति महा एकत्रीत वेतन रु. 6000/- व दोन वपर्षाच्या कालावधीसाठी नेमणुका करण्यात आलेल्या होता. सदरचा कालावधी दि. 30.10.2012 रोजी संपला आहे. तदनंतर नावाशमनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 10 दिनांक 02.04.2013 अन्वये उक्त डाटा एंट्री ऑपरेटरची विविध विभागात कामे चालु असल्यामुळे कामाचा वाढता व्याप व अपुरा संगणकिय कर्मचारी वर्ग इत्यादी बाबी लक्षात घेऊन जेएनएनयुआरएम किंवा पुढील 02 वर्षा पैकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी दर सहा महीण्याला एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन पुर्वीच्याच अटी व शर्तीवर कार्यरत असलेल्या कंत्राटी डाटा एंट्री ऑपरेटर यांना प्रति महा एकत्रीत वेतन रु. 6000/- या प्रमाणे मुदतवाढ देण्यास मान्यता प्रदान केल्यानुसार दर सहा महिण्याला एक-एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार कार्यालयीन आदेश क्रं.

नावाशमनपा/आस्था-सेल/17838/14 दिनांक 30.12.2014 अन्वये देण्यात आलेली मुदतवाढ दि. 29.06.2015 रोजी संपली असल्यामुळे दि. 30.06.2015 चा तांत्रीक खंड देवुन दिनांक 01.07.2015 ते 30.12.2015 पर्यंत कार्यालयीन आदेश क्रं. आस्था-628476/15 दि. 30.10.2015 अन्वये नंतर नावाशमनपा/आस्था-6/12829/2015 दि. 04.01.2016 अन्वये दि. 31.12.2015 चा तांत्रीक खंड देवुन दि. 01.01.2016 ते 29.06.2016 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तदनंतर कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/आस्था-6/6888/16 दिनांक 24.08.2016 अन्वये दि. 30.06.2016 चा तांत्रीक खंड देवुन दि. 01.07.2016 ते 30.12.2016 मुदतवाढ देण्यात आली आहे. पुढील मुदतवाढ देणे बाबत सध्या कार्यरत असलेल्या 09 कंत्राटी डाटा एंट्री ऑपरेटरा यांचे काम समाधानकारक आहे किंवा कसे ? तसेच त्यांच्या सेवेची मनपाकेस आवश्यकता आहे किंवा कसे या बाबत संबंधीत विभाग प्रमुखांचा अहवाल मागविण्यात आला आहे.

करिता संबंधीत विभाग प्रमुखांच्या अहवालानुसार सध्या कार्यरत असलेल्या 09 कंत्राटी डाटा एंट्री ऑपरेटरचे काम समाधानकारक असुन त्यांच्या सेवेची मनपाकेस आवश्यकता आहे. तसेच संबंधीतांच्या सेवेची मुदत दि. 30.12.2016 रोजी संपली असल्यामुळे संबंधीतांच्या सेवेस दि. 31.12.2016 रोजीचा एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन दि. 01.01.2017 ते 29.06.2017 पर्यंत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने दर महा एकत्रीत वेतन रुपये 6000/- ऐवढया वेतनावर कार्यरत असलेले कंत्राटी डाटा एंट्री ऑपरेटर (1) श्री असदुल्ला खान अजीमुल्ला खान (2) श्री आरकुले शामसुंदर गुलाबराव (3) श्री दुधडे किशोर पांडूरंग (4) श्री श्रीकांत वसंतराव अजनसोडकर (5) श्री कोकणे सिध्दार्थ खंडेराव (6) श्री नागुल महेश नरसय्या (7) श्री गुलाम रसुल गुलाम मोहम्मद (8) श्रीमती जोंधळे विजयमाला विठ्ठलराव (9) श्रीमती मंजु गिरीधारीलाल व्यास, यांच्या सेवेत मुदतवाढ देण्या बाबतचा प्रस्ताव नावाशमनपाकेच्या सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**महापौर** — प्रशासनाने डाटा एन्ट्री ऑपरेटर यांच्या सेवेस मुदतवाढीच्या प्रस्तावास बहुमताने मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.12**

**ठराव**

नावाशमनपाकेच्या प्रशासनात गतिमानता, पारदर्शकता व लोकभिमुख सेवा मध्ये लक्षणिय सुधारण घडवुन आणण्यासाठी मनपाकेच्या विविध संवर्गातील पदनिर्मिती बाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. एनव्हीसी-320202/1350/ प्र.क्र.157/03 नवि-22 दिनांक 17.08.2004 अन्वये दिलेल्या पदनिर्मितीच्या आदेशात महापालिकेकडुन या पुढे हाती घेण्यात येणारी बहुताश कामे कायम/तात्पुरते कर्मचारी नियुक्ती न करता कंत्राटी तत्वावर घेण्यात यावे व काम संपल्यानंतर कंत्राटी सेवा संपुष्टात आणण्यात याव्यात असे नमुद आहे. ही बाब विचारात घेऊन जेएनएनयुआरएम चे कार्यक्रम संपे पर्यंत किंवा पुढील दोन वर्ष या पैकी जो कमी असेल त्या कालावधी **करिता डाटा एंट्री ऑपरेटर या पदाची आवश्यकता विचारात घेवुन प्रती महा एकत्रीत वेतन रु. 6000/- वर विहित पध्दतीचा अवलंब करुन 25 डाटा एंट्री ऑपरेटरची पदे भरण्यासाठी नावाशमनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं 137 दि. 30.10.2010 अन्वये 02 वर्षासाठी मान्यता प्रदान करण्यात आली होती.**

त्यानुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन 25 डाटा एंट्री ऑपरेटरची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर प्रति महा एकत्रीत वेतन रु. 6000/- व दोन वपर्षाच्या कालावधीसाठी नेमणुका करण्यात आलेल्या होता. सदरचा कालावधी दि. 30.10.2012 रोजी संपला आहे. तदनंतर नावाशमनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 10 दिनांक 02.04.2013 अन्वये उक्त डाटा एंट्री ऑपरेटरची विविध विभागात कामे चालु असल्यामुळे कामाचा वाढता व्याप व अपुरा संगणकिय कर्मचारी वर्ग इत्यादी बाबी लक्षात घेऊन जेएनएनयुआरएम किंवा पुढील 02 वर्षा पैकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी दर सहा महीण्याला एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन पुर्वीच्याच अटी व शर्तीवर कार्यरत असलेल्या कंत्राटी डाटा एंट्री ऑपरेटर यांना प्रति महा एकत्रीत वेतन रु. 6000/- या प्रमाणे मुदतवाढ देण्यास मान्यता प्रदान केल्यानुसार दर सहा महिण्याला एक-एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार कार्यालयीन आदेश क्रं.नावाशमनपा/आस्था-सेल/17838/14 दिनांक 30.12.2014 अन्वये देण्यात आलेली मुदतवाढ दि. 29.06.2015 रोजी संपली असल्यामुळे दि. 30.06.2015 चा तांत्रीक खंड देवुन दिनांक 01.07.2015 ते 30.12.2015 पर्यंत कार्यालयीन आदेश क्रं. आस्था-628476/15 दि. 30.10.2015 अन्वये नंतर नावाशमनपा/आस्था-6/12829/2015 दि. 04.01.2016 अन्वये दि. 31.12.2015 चा तांत्रीक खंड देवुन दि. 01.01.2016 ते 29.06.2016 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तदनंतर कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/आस्था-6/6888/16 दिनांक 24.08.2016 अन्वये दि. 30.06.2016 चा तांत्रीक खंड देवुन दि. 01.07.2016 ते 30.12.2016 मुदतवाढ देण्यात आली आहे. पुढील मुदतवाढ देणे बाबत सध्या कार्यरत असलेल्या 09 कंत्राटी डाटा एंट्री ऑपरेटरा यांचे काम समाधानकारक आहे किंवा कसे ? तसेच त्यांच्या सेवेची मनपाकेस आवश्यकता आहे किंवा कसे या बाबत संबंधीत विभाग प्रमुखांचा अहवाल मागविण्यात आला आहे.

करिता संबंधीत विभाग प्रमुखांच्या अहवालानुसार सध्या कार्यरत असलेल्या 09 कंत्राटी डाटा एंट्री ऑपरेटरचे काम समाधानकारक असुन त्यांच्या सेवेची मनपाकेस आवश्यकता आहे. तसेच संबंधीतांच्या सेवेची मुदत दि. 30.12.2016 रोजी संपली असल्यामुळे संबंधीतांच्या सेवेस दि. 31.12.2016 रोजीचा एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन दि. 01.01.2017 ते 29.06.2017 पर्यंत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने दर महा एकत्रीत वेतन रुपये 6000/- ऐवढया वेतनावर कार्यरत असलेले कंत्राटी डाटा एंट्री ऑपरेटर (1) श्री असदुल्ला खान अजीमुल्ला खान (2) श्री आरकुले शामसुंदर गुलाबराव (3) श्री दुधडे किशोर पांडूरंग (4) श्री श्रीकांत वसंतराव अजनसोडकर (5) श्री कोकणे सिध्दार्थ खंडेराव (6) श्री नागुल महेश नरसय्या (7) श्री गुलाम रसुल गुलाम मोहम्मद (8) श्रीमती जोंधळे विजयमाला विठ्ठलराव (9) श्रीमती मंजु गिरीधारीलाल व्यास, यांच्या सेवेत मुदतवाढ देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.04**

**नावाशमनपा पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीने ठराव क्रं. १४ दिनांक ०३.०४.२०१७ अन्वये खालील प्रमाणे मनपा सर्वसाधारण सभेस मान्यतेसाठी शिफारस केलेली आहे.**

मनपा मार्फत चालविण्यात येणा-या मराठी व उर्दु माध्यमाच्या प्राथमिक शाळेसाठी प्रायोगीक तत्वावर शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी मरकाठी माध्यमाच्या तीन व उर्दु माध्यमाच्या तीन शाळामध्ये सेमी इंग्रजी माध्यमा सुरु करण्यासाठी इंग्रजी माध्यमातुन डि.एड. उत्तीर्ण झालेल्या (प्राधान्य TET) एकूण ०६ शिक्षकांची (मराठीसाठी ०३ व उर्दु माध्यमासाठी ०३) शिक्षकांची कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावर तात्काळ भरती करुन शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी नेमणुक करण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभेस शिफारस केलेली आहे.

**महापौर** पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीने केलेल्या शिफारसीनुसार प्रस्तावास बहुमताने मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.13** **ठराव**

नावाशमनपा पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीने ठराव क्रं. १४ दिनांक ०३.०४.२०१७ अन्वये खालील प्रमाणे मनपा सर्वसाधारण सभेस मान्यतेसाठी शिफारस केल्यानुसार मनपा मार्फत चालविण्यात येणा-या मराठी व उर्दु माध्यमाच्या प्राथमिक शाळेसाठी प्रायोगीक तत्वावर शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी मरकाठी माध्यमाच्या तीन व उर्दु माध्यमाच्या तीन शाळामध्ये सेमी इंग्रजी माध्यमा सुरु करण्यासाठी इंग्रजी माध्यमातुन डि.एड. उत्तीर्ण झालेल्या (प्राधान्य TET) एकूण ०६ शिक्षकांची (मराठीसाठी ०३ व उर्दु माध्यमासाठी ०३) शिक्षकांची कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावर तात्काळ भरती करुन शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी नेमणुक करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.05** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील विविध क्षेत्रीय कार्यालय मध्ये क्षेत्रीय अधिकारी कार्यरत आहे ज्या क्षेत्रीय अधिकारी ५ वर्षा पेक्षा एकाच ठिकाणी कार्यरत आहे अशे क्षेत्रीय अधिका-यांना तात्काळ त्या ठिकाणाहुन बदली करुन इतर क्षेत्रीय कार्यालय मध्ये पाठविणे ही सभा सर्वानुमते मंजुरी देते.

**सुचक** :- अ. सत्तार अ. गफुर **अनुमोदक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव बहुमताने मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्रं.14** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील विविध क्षेत्रीय कार्यालय मध्ये क्षेत्रीय अधिकारी कार्यरत आहे ज्या क्षेत्रीय अधिकारी 05 वर्षा पेक्षा एकाच ठिकाणी कार्यरत आहे अशे क्षेत्रीय अधिका-यांना तात्काळ त्या ठिकाणाहुन बदली / पदस्थापना करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. 06** **प्रस्ताव**

१. प्रभाग क्रं.३९ येथील मनपा प्राथमिक शाळा क्रं १५ ही सध्या एनडी-४ ( जि. प. शाळेच्या इमारतीत ) येथे असून जि.प. शाळेची पडझड झाली असून छत मोडकळीस आले आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षा लक्षात घेऊन या शालेय इमारतीची त्वरीत डागडूजी करणे.

२. सिडको प्रभाग क्रं ३९ येथील एनडी-४१ येथील राहूल नगर परिसर दलित वस्तीच्या असून या परीसरातील गोरगरीब विद्यार्थ्यांच्या प्राथमिक शिक्षणासाठी मनपाची पुर्व प्राथमिक शाळा आवश्यक आहे.करीता मान्यता दयावी.

**सुचक**:- डॉ.ललिता मुकूंद बोकारे(शिंदे) **अनुमोदक** :- सौ.मंगला गजानन देशमुख

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

प्रभाग क्रं. ३९ येथील मनपा प्रा.शा.क्रं. 15 सिडको या शाळेची इमारतीची दुरुस्ती करणे आवश्यक असून सदरील शाळेची इमारतीची दुरुस्ती करण्याविषयी सर्व शिक्षा अभियानांतर्गत निधी प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना प्रस्ताव दाखल केलेला आहे परंतु संबंधीतांकडून सर्व शिक्षा अभियान सालसन 2017-18 चे अंदाजपत्रक अद्याप पावेतो अप्राप्त असल्यामुळे सदरील निधी मान्य झाला अथवा नाही हे सांगता येणार नाही.

सिडको प्रभाग क्रं. 39 येथील एनडी-41 येथील राहूलनगर परिसर दलीत वस्तीच्या असून या परिसरातील गोरगरीब विद्यार्थ्यांच्या प्राथमिक शिक्षणासाठी मनपाची पुर्व प्राथमिक शाळा उघडण्याचा अधिकार हा मनपास नसुन सदर अधिकार हा महिला व बालविकास विभागाचा शासन निर्णय क्रं. एबाविं-2012/प्र.क्र.429/का-6 दिनांक 13 ऑगस्ट 2014 अन्वये एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय नांदेड जि. नांदेड यांना आहे त्यामुळे मनपा तर्फे पुर्व प्राथमक शाळा सुरु करता येणार नाही अशी शिफारस एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय नांदेड यांना करावी लागेल.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.15** **ठराव**

१. प्रभाग क्रं.३९ येथील मनपा प्राथमिक शाळा क्रं १५ ही सध्या एनडी-४ ( जि. प. शाळेच्या इमारतीत ) येथे असून जि.प. शाळेची पडझड झाली असून छत मोडकळीस आले आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षा लक्षात घेऊन या शालेय इमारतीची त्वरीत डागडूजी करणे.

२. सिडको प्रभाग क्रं ३९ येथील एनडी-४१ येथील राहूल नगर परिसर दलित वस्तीच्या असून या परीसरातील गोरगरीब विद्यार्थ्यांच्या प्राथमिक शिक्षणासाठी मनपाची पुर्व प्राथमिक शाळा सुरु करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. 07** **प्रस्ताव**

मनपाकेच्या प्राथमिक शाळा वजिराबाद शाळेतील वर्ग ०१ ते ०८ पर्यंत आहे शाळेला १२ शिक्षकांची मंजुरी आहेत सध्या ०९ शिक्षक कार्यरत आहे रिक्त शिक्षकांची संख्या ०४ असुन ती रिक्त जागा भरण्यात यावे.

सदरील शाळेतील ०२ वर्ग खोल्या व ०१ मोठा हॉल LBT विभागाकडे आहेत हे वर्ग मिळाले तर वाचनालय संगणक वर्ग व प्रयोगशाळा वेगळी करता येईल व गुणवत्ता वाढेल. शाळेतील पहली ते आठवी पर्यंत आहे मुलांना पुढील वर्गाचा प्रवेशासाठी त्रास होत असल्यामुळे व ०९ व १० साठी परवानगी देवून माध्यमिक शिक्षक भरण्यात यावे.

**सुचक**:- गणपतराव धबाले **अनुमोदक** :- डॉ.ललिता मुकूंद बोकारे(शिंदे)

**प्रशासकिय टिप्पणी**

नावाशमनपा नांदेड येथे सालसन 2016-17 च्या संच मान्यतेनुसार 13 शिक्षकांची मान्यता असून सद्यस्थितीत 09 शिक्षक कार्यरत आहेत तसेच मनपा शिक्षण आस्थापनेवर संच मान्यतेनुसार 89 पदांची मान्यता असून 54 सहशिक्षक कार्यरत आहेत त्यानुसार सदरील रिक्त जागेवर पात्र उमेदवार उपलब्ध करुन देण्या बाबत वारंवार मा. शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांना (1) मा शिक्षण आयुक्त महाराष्ट्र राज्य पुणे यांना पाठविण्यात आलेले पत्र क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-7/8793/15 दिनांक 09.10.2015 (2) मा. शिक्षण आयुक्त महाराष्ट्र राज्य पुणे यांना पाठविण्यात आलेले पत्र क्रं. नावाशमनपा/शिअ/14626/2016 दिनांक 09.02.2016 (3) मा. शिक्षण उपसंचालक विभागीय उपसंचालक कार्यालय लातुर यांना पाठविण्यात आलेले पत्र क्रं. नावाशमनपा/शिअ/15529/2016 दिनांक 25.02.2016 (4) मा. शिक्षण उपसंचालक विभागीय उपसंचालक कार्यालय लातुर यांना पाठविण्यात आलेले पत्र क्रं. नावाशमनपा/शिअकक्ष/ 3070/2016 दि. 08.06.2016 यांना वारंवार पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे परंतु संबंधीतांकडून पात्र उमेदवार उपलब्ध झालेले नाहीत तसेच शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचा शासन निर्णय क्रं. पीआरइ-2006/4767/प्राशि-1 दिनांक 16 डिसेंबर 2009 अन्वये सालसन 2009-10 या वर्षापासुन पुढे प्राथमिक शिक्षण सेवक भरती प्रक्रिया केंद्रीय भरतीपुर्व निवड परिक्षेव्दारे करण्या बाबत.

सदरील शाळेतील 02 वर्गखोल्या रिकाम्या करण्या बाबत LBT विभागास जा.क्रं. नावाशमनपा/शिवि/1601/2014 दिनांक 02 मे 2017 अन्वये पत्र देण्यात आलेले आहे तसेच सदरील शाळेस जोडून माध्यमिक शाळेचे इयत्ता 9 व 10 वी वर्ग जोडण्या बाबत या पुर्वीच संचिका प्रस्तावित केलेली आहे.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्तावा बहुमताने मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.16** **ठराव**

मनपाकेच्या प्राथमिक शाळा वजिराबाद शाळेतील वर्ग ०१ ते ०८ पर्यंत आहे शाळेला १२ शिक्षकांची मंजुरी आहेत सध्या ०९ शिक्षक कार्यरत आहे रिक्त शिक्षकांची संख्या ०४ असुन ती रिक्त जागा भरण्यात यावे.

सदरील शाळेतील ०२ वर्ग खोल्या व ०१ मोठा हॉल LBT विभागाकडे आहेत हे वर्ग मिळाले तर वाचनालय संगणक वर्ग व प्रयोगशाळा वेगळी करता येईल व गुणवत्ता वाढेल. शाळेतील पहली ते आठवी पर्यंत आहे मुलांना पुढील वर्गाचा प्रवेशासाठी त्रास होत असल्यामुळे व ०९ व १० साठी परवानगी देवून माध्यमिक शिक्षक भरण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.08** **प्रस्ताव**

जुन्या नांदेड शहरामध्ये पाणी पुरवठा वेळोवेळी खंडीत होऊन नागरीकांना फार त्रास होत आहे ठराविक वेळेवर पाणी पुरवठा होत नाही.

सणासुदीच्या काळात सुध्दा लोकांना पाणी पुरवठा वेळेवर होण्यास अडथळा होत आहे कारण काबरानगरा जलशुध्दीकरण केंद्रावरुन अनेक जलकुंभ असल्यामुळे जुन्या नांदेड शहरातील जलकुंभ टाकावर असल्यामुळे जलकुंभ भरण्यास विलंब होत आहे नविन नांदेड मध्ये पाणी पुरवठा होते वेळी जुन्या नांदेड भागातील जलकुंभ भरण्यास विलंब होत आहे. कारण संपमधील पाणी संपुन संपचे लेवल खाली जात आहे. सदर संप मधील पाण्याचे लेवल होईपर्यंत जुन्या नांदेड भागात पाणी पुरवठा ठराविक वेळेत न होता विस्कळीत होत आहे अनेक वेळा सणा सुदीच्या वेळेवर सुध्दा पाणी पुरवठा होऊ शकला नाही.

करिता जुन्या नांदेड भागात सुरळीत पाणी पुरवठा करण्यासाठ एक ३५ एम.एल.डी. चे WTP कोणत्याही शासकीय निधीतुन त्वरीत बांधून घेण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- स. शेर अली **अनुमोदक** :- शफी अहेमद कुरेशी, अ. सत्तार अ. गफुर, शेख हबीब बावजीर

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव बहुमताने मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.17** **ठराव**

जुन्या नांदेड शहरामध्ये पाणी पुरवठा वेळोवेळी खंडीत होऊन नागरीकांना फार त्रास होत आहे ठराविक वेळेवर पाणी पुरवठा होत नाही.

सणासुदीच्या काळात सुध्दा लोकांना पाणी पुरवठा वेळेवर होण्यास अडथळा होत आहे कारण काबरानगरा जलशुध्दीकरण केंद्रावरुन अनेक जलकुंभ असल्यामुळे जुन्या नांदेड शहरातील जलकुंभ टाकावर असल्यामुळे जलकुंभ भरण्यास विलंब होत आहे नविन नांदेड मध्ये पाणी पुरवठा होते वेळी जुन्या नांदेड भागातील जलकुंभ भरण्यास विलंब होत आहे. कारण संपमधील पाणी संपुन संपचे लेवल खाली जात आहे. सदर संप मधील पाण्याचे लेवल होईपर्यंत जुन्या नांदेड भागात पाणी पुरवठा ठराविक वेळेत न होता विस्कळीत होत आहे अनेक वेळा सणा सुदीच्या वेळेवर सुध्दा पाणी पुरवठा होऊ शकला नाही.

करिता जुन्या नांदेड भागात सुरळीत पाणी पुरवठा करण्यासाठ एक ३५ एम.एल.डी. चे WTP कोणत्याही शासकीय निधीतुन त्वरीत बांधून घेण्यास ही सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.09** **प्रस्ताव**

नावाशमनपा नांदेडच्या वतीने 15 शाळा चालविण्यात येत असून मनपा शिक्षण आस्थापनेवर सालसन 2016-17 च्या संच मान्यतेनुसार 89 पदांची मान्यता आहे. परंतु सद्यस्थितीत केवळ 54 सह शिक्षक कार्यरत असुन 35 पदे ही रिक्त आहेत. त्यामुळे शाळेवर ध्यापन करण्यासाठी सह शिक्षकांची संख्या अपुरी पडत असून याचा परिणाम हा थेट विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर पडत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्याअनुषंगाने मनपा शिक्षण आस्थापनेवर रिक्त असलेली सहशिक्षकांची पदे ही त्वरीत भरणे आवश्यक आहे.

करिता मनपा शिक्षण आस्थापनेवरील रिक्त असलेली सहशिक्षकांची पदे तासिक तत्वावर भरण्यासाठी ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते.

**सुचक** :- डॉ. शीला सुनील कदम **अनुमोदक** :- सौ. ललीता मुकूंदराव बोकारे

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेडच्या वतीने १५ शाळा चालविण्यात येत असुन मनपा शिक्षण आस्थापनेवर सालसन २०१६-१७ च्या संच मान्यतेनुसार ८९ पदांची मान्यता आहे.परंतू सद्यस्थितीत केवळ ५४ सहशिक्षक कार्यरत असुन ३५ पदे ही रिक्त आहेत.त्यानुसार सदरील रिक्त जागेवर पात्र उमेदवार उपलब्ध करुन देण्याबाबत वारंवार मा.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना वारंवार पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. परंतू अद्याप पावेतो संबंधित कार्यालयाकडून पात्र उमेदवार उपलब्ध झालेले नाहीत तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्र:पीआरई-२००६/(४७६७)/प्राशि-१, दि. १६ डिसेंबर, २००९ अन्वये सालसन २००९-१० या वर्षापासून पुढे प्राथमिक शिक्षण सेवक भरती प्रक्रीया केंद्रीय भरतीपूर्व निवड परीक्षेव्दारे करण्याबाबात आदेशीत करण्यात आलेले आहे. त्यानुसार सदर शिक्षणसेवकांची पदे भरण्याचा अधिकार मनपास नाही. परंतू मनपा शिक्षण आस्थापणेवर रिक्त असलेली पदे तासिका तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात भरणे आवश्यक आहे जेणेकरुन येत्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही व गुणवत्ता वाढीस चालना मिळेल. तसेच संबंधित कार्यालयाकडून सदर पदावर पात्र उमेदवार उपलब्ध होताच तासिक तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात भरलेल्या उमेदवारांना तात्काळ कामावरुन कमी करून पात्र उमेदवारांना सेवेत रुजू करुन घेण्यात येईल.

करिता माहितीस्तव सविनय सादर.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव बहुमताने मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.18** **ठराव**

नावाशमनपा नांदेडच्या वतीने 15 शाळा चालविण्यात येत असून मनपा शिक्षण आस्थापनेवर सालसन 2016-17 च्या संच मान्यतेनुसार 89 पदांची मान्यता आहे. परंतु सद्यस्थितीत केवळ 54 सह शिक्षक कार्यरत असुन 35 पदे ही रिक्त आहेत. त्यामुळे शाळेवर ध्यापन करण्यासाठी सह शिक्षकांची संख्या अपुरी पडत असून याचा परिणाम हा थेट विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर पडत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्याअनुषंगाने मनपा शिक्षण आस्थापनेवर रिक्त असलेली सहशिक्षकांची पदे ही त्वरीत भरणे आवश्यक आहे.

करिता मनपा शिक्षण आस्थापनेवरील रिक्त असलेली सहशिक्षकांची पदे तासिक तत्वावर भरण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.10** **प्रस्ताव**

अपंग राष्ट्रीय जलतरण स्पर्धेमध्ये नांदेड येथील श्री बालाजी साहेबराव देशमुख रा. कलामंदिर बाजुस सोमेश कॉलनी नांदेड यांनी भारतातुन तिसरा क्रमांक पटकावला आहे. पुढील कार्यासाठी त्यांना भारतीय टीम मध्ये स्थान मिळण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. संबंधीत हे दहावी उत्तीर्ण असून ते अत्यंत दारिद्रय रेषेखाली जीवन जगत असून ते दारिद्रय रेषेखालील आहेत. श्री बालाजी साहेबराव देशमुख यांना महानगरपालिकेत तात्पुरत्या स्वरुपात रोजंदारीवर (मानधनावर) नौकरी देणेकरिता हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक** :- सौ. शर्मा पुष्पाताई राजेश **अनुमोदक** :- तुलजाराम यादव

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्तावा बहुमताने मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.19** **ठराव**

अपंग राष्ट्रीय जलतरण स्पर्धेमध्ये नांदेड येथील श्री बालाजी साहेबराव देशमुख रा. कलामंदिर बाजुस सोमेश कॉलनी नांदेड यांनी भारतातुन तिसरा क्रमांक पटकावला आहे. पुढील कार्यासाठी त्यांना भारतीय टीम मध्ये स्थान मिळण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. संबंधीत हे दहावी उत्तीर्ण असून ते अत्यंत दारिद्रय रेषेखाली जीवन जगत असून ते दारिद्रय रेषेखालील आहेत. श्री बालाजी साहेबराव देशमुख यांना महानगरपालिकेत तात्पुरत्या स्वरुपात रोजंदारीवर (मानधनावर) नौकरी देणेकरिता हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**विषय क्रं.11** **प्रस्ताव**

नविन विकास नियंत्रक नियमावलीनुसार आवश्यक त्या समिती गठीत करुन बांधकाम परवानगी सुरळीत करणे बाबत

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- आनंद चव्हाण

**सभागृहनेता** शासन निर्णय क्रं. टिपीएस-1812/सिआर-112/12/डिसीआर डी कलास/युडी-13 दि. 20.09.2016 अन्वये ड वर्ग महानगरपालिकासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजुर केलेली आहे. सदर नियमावली महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-अ मध्ये उपविभाग मध्ये दिनांक 29 ते 05 ऑक्टोंबर 2016 रोजी पृष्ठ क्रं. 01 ते 210 वर प्रसिध्द झालेली आहे. सदर नियमावलीमधील नियम क्रं 26.6 प्रमाणे इमारतीची उंची 36.0 मी. व त्यापेक्षा जास्त व 50.0 मी. पर्यंत उंचीच्या इमारतीसाठी समती गठीत करण्यात यावी High Rise Committee समोर ठेवुन मान्यता घेवुन त्यानुसार मनपाकेसाठी High Rise Committee समिती (1) अतिरिक्त आयुक्त/उपआयुक्त (विकास) (2) सहाय्यक संचालक नगररचनाकार शाखा नांदेड (3) अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन, अथवा विभागाने प्राधिकृत केलेले अधिकारी ते ही कार्यकारी अभियंता पदाचा असावा (4) विभाग प्रमुख Soil Mech शासकिय अभियांत्रीकी महाविद्यालय नांदेड (5) विभाग प्रमुख Structure MGM / SGGS अभियांत्रीकी महाविद्यालय नांदेड (6) अग्निशमन अधिकारी नावाशमनपा नांदेड (7) सहाय्यक संचालक नगररचनाकार नावाशमनपा नांदेड (8) Structure Engineer of Concnerned Project यांची एक गठीत करण्यात यावी. सदरील समितीने नियम क्रं. 26.6 प्रमाणे सर्व बाबीची तपासणी करुन आपला अहवाल सादर केल्यानंतर प्रशासनाने बांधकाम परवानगी तात्काळ देण्याची कार्यवाही करावी.

**अ. सत्तार अ. गफुर** सभागृहनेता यांनी विकास नियंत्रक नियमावलीनुसार वरील प्रमाणे समिती गठीत करुन बांधकाम परवानगी सुरळीत करण्यासाठी जे दुरुस्ती प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** सभागृहनेता यांनी शासन निर्णय क्रं. टिपीएस-1812/सिआर-112/12/डिसीआर डी कलास/युडी-13 दि. 20.09.2016 अन्वये ड वर्ग महानगरपालिकासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजुर केलेली आहे. सदर नियमावली महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-अ मध्ये उपविभाग मध्ये दिनांक 29 ते 05 ऑक्टोंबर 2016 रोजी पृष्ठ क्रं. 01 ते 210 वर प्रसिध्द झालेली आहे. सदर नियमावलीमधील नियम क्रं 26.6 प्रमाणे इमारतीची उंची 36.0 मी. व त्यापेक्षा जास्त व 50.0 मी. पर्यंत उंचीच्या इमारतीसाठी समती गठीत करण्यात यावी High Rise Committee समोर ठेवुन मान्यता घेवुन त्यानुसार मनपाकेसाठी High Rise Committee समिती (1) अतिरिक्त आयुक्त/उपआयुक्त (विकास) (2) सहाय्यक संचालक नगररचनाकार शाखा नांदेड (3) अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन, अथवा विभागाने प्राधिकृत केलेले अधिकारी ते ही कार्यकारी अभियंता पदाचा असावा (4) विभाग प्रमुख Soil Mech शासकिय अभियांत्रीकी महाविद्यालय नांदेड (5) विभाग प्रमुख Structure MGM / SGGS अभियांत्रीकी महाविद्यालय नांदेड (6) अग्निशमन अधिकारी नावाशमनपा नांदेड (7) सहाय्यक संचालक नगररचनाकार नावाशमनपा नांदेड (8) Structure Engineer of Concnerned Project यांची एक गठीत करण्यात यावी. सदरील समितीने नियम क्रं. 26.6 प्रमाणे सर्व बाबीची तपासणी करुन आपला अहवाल सादर केल्यानंतर प्रशासनाने बांधकाम परवानगी देण्यासाठी समिति गठीत करुन बांधकाम परवानगी तात्काळ दिल्यास मनपाकेचे उत्पन्न वाढेल त्यामुळे सभागृहनेता त्यांनी वरील प्रमाणे जे दुरुस्ती प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.20** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत उंच इमारतीचे बांधकाम परवानगी नागरीकांना देण्यासाठी व महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासन निर्णय क्रं. टिपीएस-1812/सिआर-112/12/डिसीआर डी कलास/युडी-13 दि. 20.09.2016 अन्वये ड वर्ग महानगरपालिकासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजुर केलेली आहे. सदर नियमावली महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-अ मध्ये उपविभाग मध्ये दिनांक 29 ते 05 ऑक्टोंबर 2016 रोजी पृष्ठ क्रं. 01 ते 210 वर प्रसिध्द झालेली आहे. सदर नियमावली मधील नियम क्रं 26.6 प्रमाणे इमारतीची उंची 36.0 मी. व त्यापेक्षा जास्त व 50.0 मी. पर्यंत उंचीच्या इमारतीसाठी समिती गठीत करण्यात यावी High Rise Committee समोर ठेवुन मान्यता घेवुन त्यानुसार खालील प्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेसाठी High Rise Committee समिती गठीत करण्यात येते.

| अ.क्र. | सदस्य | पद | |
|---|---|---|---|
| 01 | अतिरिक्त आयुक्त / उपआयुक्त (विकास) | सभापती | उप आयुक्त ( विकास ) |
| 02 | सहाय्यक संचालक नगररचनाकार शाखा नांदेड | सदस्य | सहाय्यक संचालक नगररचनाकार शाखा नांदेड |
| 03 | अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन, अथवा विभागाने प्राधिकृत केलेले अधिकारी ते ही कार्यकारी अभियंता पदापेक्षा कमी दर्जाचा नसावा | सदस्य | अधि.अभि. अथवा कार्यकारी अभि. साबावि महाराष्ट्र शासन नांदेड |
| 04 | विभाग प्रमुख Soil Mech शासकिय अभियांत्रीकी महाविद्यालय नांदेड | सदस्य | विभाग प्रमुख Soil Mech शासकिय अभियांत्रीकी महाविद्यालय नांदेड |
| 05 | विभाग प्रमुख Structure MGM / SGGS अभियांत्रीकी महाविद्यालय नांदेड | सदस्य | विभाग प्रमुख Structure MGM / SGGS अभियांत्रीकी महाविद्यालय नांदेड |
| 06 | अग्निशमन अधिकारी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड | सदस्य | अग्निशमन अधिकारी नावाशमनपा नांदेड |
| 07 | सहाय्यक संचालक नगररचनाकार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड | सदस्य | सहाय्यक संचालक नगररचनाकार नावाशमनपा नांदेड |
| 08 | Structure Engineer of Concnerned Project | आवशक्तेनुसार | Structure Engineer of Concnerned Project |

करिता वरील प्रमाणे समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात येते सदरील समितीने नियम क्रं. 26.6 प्रमाणे सर्व बाबींची तपासणी करुन आपला अहवाल दिल्यानंतर उक्त प्रमाणे बांधकाम परवानगी देण्यास हि मनपा सर्वसाधसारण सभा सर्वानुमते मंजुर करते. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.12** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वार्षिक तय बाजारी उत्पन्ना बाबत चर्चा करणे

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- आनंद चव्हाण

**सभागृहनेता** मालमत्ता व्यवस्थापक यांनी तयबाजरी व मध्यवर्ती बसस्थानका समोरील उड्डाणपुल खाली (उत्तर बाजु) येथील वाहनतळ + उपहारगृह चालविण्यासाठी मक्तेदार नियुक्ती बाबतची सविस्तर माहिति देण्यात यावी

**मालमत्ता व्यवस्थापक** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील तयबाजारी वसुली मक्ता सालसन 2014-15 मध्ये रुपये 72,00,000/- यास देण्यात आला आला होता व सालसन 2015-16 मध्ये स्पर्धा होऊन रुपये 90,50,000/- या रक्कमेस मक्ता देण्यात आला होता. परंतु सदर गुत्तेदाराने नियम अटीचे उल्लंघन करुन मकत्याची रक्कम भरणा केली नसल्यामुळे त्यांचेकडून जुलै मध्ये मक्ता काढून घेण्यात आला.

ऑगस्ट 2016 ते 31 मार्च 2017 मध्ये काढून 8 महिण्याचा प्रतिमहा रुपये 7,26,000/- (अक्षरी रुपये सात लक्ष सव्वस हजार फक्त) या प्रमाणे 8X726000 = 58,08,000/- एवढया रक्कमेची निविदा प्रसिध्द करण्यात आली त्यामध्ये कोणत्याही संस्थेने सहभाग नोंदविला नाही त्यामुळे पुन्हा निविदा मागविण्यात आल्या दुस-या वेळेसही ई-निविदा प्रक्रियेत कोणत्याही संस्थेनी सहभाग नोंदविला नाही त्यामुहे मनपा कर्मचा-यांमार्फत दिनांक 05.11.2015 पासुन मनपा कर्मचा-यांकडून तयबाजारी वसुल करण्यात येते. दिनांक 01.04.2017 ते 31.03.2018 पर्यंतचा तयबाजारी मक्ता देण्यासाठी तिन वेळा निविदा मागविण्यात आल्या आहेत तरी साल सन 2017-18 मध्येही ई निविदा प्रक्रियेत कोणत्यहाी संस्थेनी सहभाग नोंदविला नाही.

तयबाजारी मक्ता सालसन 2015-16 मध्ये रुपये 90,50,000/- यास देण्यात आला होता पण मक्ताधारकांनी नियम अटीचे पालन केले नाही व मक्ताची रक्कम भरणा केली नाही म्हणुन त्यांच्याकडून मक्ता काढून घेतला होता तदनंतर दिनांक 01.04.2017 ते 31.03.2018 पर्यंत मक्ता रुपये 90,50,000/- यावर सालसन 2016-17 ची 10% नैसर्गिक वाढ रुपये 95,000/- व सालसन 2017-2018 ची 10% नैसर्गिक वाढ रुपये 9,95,500/- गृहीत धरुन सरकारी बोली रुपये 1,09,50,500/- इतकी अपेक्षीत धरुन ई निविदा प्रक्रिया अवलंबुन तीन वेळेस ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. तरी पण ई निविदा प्रक्रियेत कोणत्याही संस्थेनी सहभाग नोंदविला नाही. सध्या महानगरपालिका कर्मचा-यां मार्फत सध्या तयबाजारी वसुली चालु आहेत.

सालसन 2016-17 या आर्थीक वर्षात महानगरपालिका कर्मचा-यांमार्फत फक्त रुपये 30,15,190/- ऐवढे वसुल झालेले आहेत. तयबाजारी वसुली कर्मचा-यांवर पगारापोटी खर्च होत आहे त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान होत आहे.

सालसन 2016-17 या आर्थीक वर्षात दोनवेळेस व सालसन 2017-18 या आर्थीक वर्षात तीन वेळेस ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या आहेत. ई-निविदा प्रक्रियेत कोणत्याही संस्थेने सहभाग नोंदविला नाही. महानगरपालिकेच्या दहा कर्मचा-यां मार्फत तयबाजारी वसुली करण्यात येत आहे. मनपाकेस पाहिजे तेवढया प्रमाणात तयबाजारीची रक्कम वसुली होत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान होत आहे. सालसन 2014-15 च्या तयबाजारीचा मक्ता रुपये 72,00,000/- मध्ये देण्यात आला होता.

त्याची संपुर्ण रक्कम मक्तेदाराने मनपाकेत भरणा केली आहे. तो मक्ता यशस्वी झालेली रक्कम रुपये 72,00,000/- ही किंत आधारभुत धरुन त्यावर 10% नैसर्गिक वाढ धरुन रुपये 79,20,000/- एवढी येत असल्यामुळे निविदा रक्कम रुपये 80,00,000/- अपेक्षीत धरुन सदर तयबाजारी मक्ता जाहीर ई-निविदा व्दारे देण्यास मान्यता देण्यात यावी

तसेच मध्यवर्ती बसस्थानका समोरील उड्डाणपुल खाली (उत्तर बाजु) येथील वाहनतळ + उपहारगृह चालविण्यासाठी मक्तेदार नियुक्त करण्यासाठी रुपये 11,77,000/- एवढया रक्कमेची तीन वेळेस निविदा मागविण्यात आली होती. पण कोणीही मक्तेदार सदरची निविदा घेण्यास तयार नसल्याने रुपये 11,77,000/- ऐवजी पुर्वीची यशस्वी झालेली रक्कम रुपये 10,75,000/- आधारभुत धरुन जाहीर ई-निविदा देण्यास मान्यता देण्यात यावी

**सभागृहनेता** मालमत्ता व्यवस्थापक यांनी सविस्तर माहिती दिलेली असुन त्यानुसार तयबाजारीची ई-निविदा अनेक वेळा देण्यात आलेली असुन त्यास प्रतिसाद भेटत नसल्याने व मनपाकेच्या कर्मचा-या मार्फत तयबाजारी वसुली करण्यात येत असल्याने ती वसुली अतिशय कमी होत आहे. तसेच मनपाकेस पाहिजे तेवढया प्रमाणात तयबाजारीची रक्कम वसुली होत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान होत आहे. सालसन 2014-15 च्या तयबाजारीचा मक्ता रुपये 72,00,000/- मध्ये देण्यात आला होता. त्याची संपुर्ण रक्कम मक्तेदाराने मनपाकेत भरणा केली आहे. तो मक्ता यशस्वी झालेली रक्कम रुपये 72,00,000/- ही किंत आधारभुत धरुन त्यावर 10% नैसर्गिक वाढ धरुन रुपये 79,20,000/- एवढी येत असल्यामुळे निविदा रक्कम रुपये 80,00,000/- अपेक्षीत धरुन सदर तयबाजारी मक्ता ई-निविदा व्दारे प्रतिसाद मिळत नसल्याने महापालिकेचा आर्थीक नुकसान होत आहे त्यामुळे तयबाजारीची ई-निविदा ऐवजी जाहीर लिलावव्दारे देण्यासाठी मान्यता देण्यात यावी तसेच मध्यवर्ती बसस्थानका समोरील उड्डाणपुल खाली (उत्तर बाजु) येथील वाहनतळ + उपहारगृह चालविण्यासाठी मक्तेदार नियुक्त करण्यासाठी रुपये 11,77,000/- एवढया रक्कमेची तीन वेळेस निविदा मागविण्यात आली होती. पण कोणीही मक्तेदार सदरची निविदा घेण्यास तयार नसल्याने रुपये 11,77,000/- ऐवजी पुर्वीची यशस्वी झालेली रक्कम रुपये 10,75,000/- आधारभुत धरुन जाहीर लिलावाव्दारे देण्यास मान्यता देण्यात यावी अशी माझा प्रस्ताव आहे.

**आनंद चव्हाण** मालमत्ता व्यवस्थापक यांनी सविस्तर माहिती दिलेली असुन त्याअनुषंगाने सभागृहानेता यांनी सदरच्या माहितीनुसार त्यास मान्यता देण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** मालमत्ता व्यवस्थापक यांनी सविस्तर माहिती दिल्यानुसार सभागृहनेता यांनी तयबाजारीची ई-निविदा अनेक वेळा देण्यात आलेली असुन त्यास प्रतिसाद भेटत नसल्याने व मनपाकेच्या कर्मचा-या मार्फत तयबाजारी वसुली करण्यात येत असल्याने ती वसुली अतिशय कमी होत आहे. तसेच मनपाकेस पाहिजे तेवढया प्रमाणात तयबाजारीची रक्कम वसुली होत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान होत आहे. सालसन 2014-15 च्या तयबाजारीचा मक्ता रुपये 72,00,000/- मध्ये देण्यात आला होता. त्याची संपुर्ण रक्कम मक्तेदाराने मनपाकेत भरणा केली आहे. तो मक्ता यशस्वी झालेली रक्कम रुपये 72,00,000/- ही किंत आधारभुत धरुन त्यावर 10% नैसर्गिक वाढ धरुन रुपये 79,20,000/- एवढी येत असल्यामुळे निविदा रक्कम रुपये 80,00,000/- अपेक्षीत धरुन सदर तयबाजारी मक्ता जाहीर लिलावव्दारे देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देण्यात येते. तसेच मध्यवर्ती बसस्थानका समोरील उड्डाणपुल खाली (उत्तर बाजु) येथील वाहनतळ + उपहारगृह चालविण्यासाठी मक्तेदार नियुक्त करण्यासाठी रुपये 11,77,000/- एवढया रक्कमेची तीन वेळेस निविदा मागविण्यात आली होती. पण कोणीही मक्तेदार सदरची निविदा घेण्यास तयार नसल्याने रुपये 11,77,000/- ऐवजी पुर्वीची यशस्वी झालेली रक्कम रुपये 10,75,000/- आधारभुत धरुन जाहीर लिलावाव्दारे हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो, नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.21** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील तयबाजारी वसुली मक्ता सालसन 2014-15 मध्ये रुपये 72,00,000/- यास देण्यात आला आला होता व सालसन 2015-16 मध्ये स्पर्धा होऊन रुपये 90,50,000/- या रक्कमेस मक्ता देण्यात आला होता. परंतु सदर गुत्तेदाराने नियम अटीचे उल्लंघन करुन मकत्याची रक्कम भरणा केली नसल्यामुळे त्यांचेकडून जुलै मध्ये मक्ता काढून घेण्यात आला.

माहे ऑगस्ट 2016 ते 31 मार्च 2017 मध्ये काढून 8 महिण्याचा प्रतिमहा रुपये 7,26,000/- (अक्षरी रुपये सात लक्ष सव्वीस हजार फक्त) या प्रमाणे 8X726000 = 58,08,000/- एवढया रक्कमेची निविदा प्रसिध्द करण्यात आली त्यामध्ये कोणत्याही संस्थेने सहभाग नोंदविला नाही त्यामुळे पुन्हा निविदा मागविण्यात आल्या दुस-या वेळेसही ई-निविदा प्रक्रियेत कोणत्याही संस्थेनी सहभाग नोंदविला नाही त्यामुहे मनपा कर्मचा-यांमार्फत दिनांक 05.11.2015 पासुन मनपा कर्मचा-यांकडून तयबाजारी वसुल करण्यात येते. दिनांक 01.04.2017 ते 31.03.2018 पर्यंतचा तयबाजारी मक्ता देण्यासाठी तिन वेळा निविदा मागविण्यात आल्या आहेत तरी साल सन 2017-18 मध्येही ई-निविदा प्रक्रियेत कोणत्यही संस्थेनी सहभाग घेतलेला नाही.

तयबाजारी मक्ता सालसन 2015-16 मध्ये रुपये 90,50,000/- यास देण्यात आला होता पण मक्ताधारकांनी नियम अटीचे पालन केले नाही व मक्ताची रक्कम भरणा केली नाही म्हणुन त्यांच्याकडून मक्ता काढून घेतला होता तदनंतर दिनांक 01.04.2017 ते 31.03.2018 पर्यंत मक्ता रुपये 90,50,000/- यावर सालसन 2016-17 ची 10% नैसर्गिक वाढ रुपये 95,000/- व सालसन 2017-2018 ची 10% नैसर्गिक वाढ रुपये 9,95,500/- गृहीत धरुन सरकारी बोली रुपये 1,09,50,500/- इतकी अपेक्षीत धरुन ई-निविदा प्रक्रिया अवलंबुन तीन वेळेस ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. तरी पण ई-निविदा प्रक्रियेत कोणत्याही संस्थेनी सहभाग घेतलेला नाही. सध्या महानगरपालिका कर्मचा-यां मार्फत तयबाजारी वसुली चालु आहे.

सालसन 2016-17 या आर्थीक वर्षात महानगरपालिका कर्मचा-यांमार्फत फक्त रुपये 30,15,190/- ऐवढे वसुल झालेले आहेत. तयबाजारी वसुली कर्मचा-यांवर पगारापोटी खर्च होत आहे त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान होत आहे.

सालसन 2016-17 या आर्थीक वर्षात दोनवेळेस व सालसन 2017-18 या आर्थीक वर्षात तीन वेळेस ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या आहेत. ई-निविदा प्रक्रियेत कोणत्याही संस्थेने सहभाग नोंदविला नाही. महानगरपालिकेच्या दहा कर्मचा-यां मार्फत तयबाजारी वसुली करण्यात येत आहे. मनपाकेस पाहिजे तेवढया प्रमाणात तयबाजारीची रक्कम वसुली होत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान होत आहे. सालसन 2014-15 च्या तयबाजारीचा मक्ता रुपये 72,00,000/- मध्ये देण्यात आला होता. त्याची संपुर्ण रक्कम मक्तेदाराने मनपाकेत भरणा केली आहे. तो मक्ता यशस्वी झालेली रक्कम रुपये 72,00,000/- ही किंमत आधारभुत धरुन त्यावर 10% नैसर्गिक वाढ धरुन रुपये 79,20,000/- एवढी येत असल्यामुळे निविदा रक्कम रुपये 80,00,000/- अपेक्षीत धरुन सदर तयबाजारी मक्ता जाहीर लिलावाव्दारे देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

तसेच मध्यवर्ती बसस्थानका समोरील उड्डाणपुल खाली (उत्तर बाजु) येथील वाहनतळ + उपहारगृह चालविण्यासाठी मक्तेदार नियुक्त करण्यासाठी रुपये 11,77,000/- एवढया रक्कमेची तीन वेळेस निविदा मागविण्यात आली होती. पण कोणीही मक्तेदार सदरची निविदा घेण्यास तयार नसल्याने रुपये 11,77,000/- ऐवजी पुर्वीची यशस्वी झालेली रक्कम रुपये 10,75,000/- आधारभुत धरुन जाहीर लिलावाव्दारे देण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**विषय क्रं.13** **प्रस्ताव**

शासनाचे परिपत्र दिनांक 12.04.2017 अन्वये B-2 निविदा प्रक्रियेबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- आनंद चव्हाण

**सभागृहनेता** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत B-2 प्रमाणे निविदा न करता B-1 (Percentage Rate) जुन्या पध्दतीने म्हणजे निविदा प्रक्रिया करण्यास मान्यता देण्यात यावी.

**महापौर** सभागृह नेता यांनी सुचविल्यानुसार B-1 (Percentage Rate) निविदा जुन्या पध्दतीने करण्यासाठी केलेली मागणीस मान्यता बहुमताने देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.22** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत B-2 निविदा प्रमाणे न करता जुन्या पध्दतीने B-1 (Percentage Rate) निविदा प्रक्रिया करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.14** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता धारकांना पाणी कराच्या चुकीचे मागणी बिल बाबत अभिलेख तपासुन योग्य दुरुस्तीसह मागणी बिले देणे बाबत

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- आनंद चव्हाण

**सभागृहनेता** सदरील माझ्या प्रस्तावा पुढील दुरुस्ती करुन त्यास मान्यता देण्यात यावी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता धारकांना e-governance नव्याने चालु असल्यामुळे पाणी कराच्या चुकीचे मागणी बिल बाबत अभिलेखे प्रमाणे दुरुस्ती करुन मागणी बिल मालमत्ता धारकांना देण्यासाठी बहुमताने मंजुर देण्यात यावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा.

**आनंद चव्हाण** सभागृहनेता यांनी जो दुरुस्ती प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** सभागृहनेता यांनी त्यांच्या प्रस्ताव पुढील प्रमाणे दुरुस्ती करण्यास नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता धारकांना e-governance नव्याने चालु असल्यामुळे पाणी कराच्या चुकीचे मागणी बिल बाबत अभिलेखे प्रमाणे दुरुस्ती करुन मागणी बिल मालमत्ता धारकांना देण्यासाठी हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मंजुरी देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.23** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता धारकांना e-governance नव्याने चालु असल्यामुळे पाणी कराच्या चुकीचे मागणी बिल बाबत अभिलेखे प्रमाणे दुरुस्ती करुन मागणी बिल मालमत्ता धारकांना देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

## विशेष बाब म्हणुन आयत्या वेळी घेण्यात आलेला

**विषय क्र.**

मौजे कौठा गट क्रं. 80 मधील शासकीय गायरान जमिन महापालिकेकडे हस्तांतरित झाल्यामुळे कार्यालयीन आदेश क्रं. 1454 दिनांक 29.04.2017 रोजीच्या आदेशानुसार सदर जागेवर विकासाचे काम हाती घ्यावयाचे असल्यामुळे खालील प्रमाणे 10 अतिक्रमण धारकांना महापालिका क्षेत्रातील गोवर्धन घाट येथील बीएसयुपी योजने अंतर्गत बांधलेल्या घरकुलामध्ये स्थलांरित करावयाचे असल्याने नियमानुसार संबंधीताकडून कागदपत्राची पुर्तता व लोकसहभागाची रक्कम प्राप्त करुन सदर अतिक्रमण धारकांना पुनर्वसन करावयाचे आहे.

1) नानककौर भ्र. मदनसिंग वय 54 वर्ष, धंदा घरकाम रा. गुरुव्दारा रोड नांदेड
2) बलवंतसिंघ चंदासिंघ कंधारवाले, वय 57 वर्ष, धंदा पुजारी, रा. गुरुव्दारा गेट क्रं. 2 नांदेड
